
मुंबई पोर्ट ट्रस्ट

# अपना पोर्ट

## महिला दिन विशेषांक

अप्रैल-जून 2019



**संपादक**
श्री. राजेंद्र पैबीर, सचिव एवं मुख्य राजभाषा अधिकारी
**संपादक मंडल**
श्री. पी.एन. बाहेकर, वरिष्ठ उप प्रबंधक (कल्याण)
श्री. मंदार ल. पारकर, उप सचिव एवं हिंदी अधिकारी
श्रीमती पुनम चं. निब्रे, प्रशासनिक अधिकारी
श्री. राजन ल. लाड, (वरिष्ठ हिंदी अनुवादक) - ग्राफिक एवं अभिकल्प

# Coffee with Chairman




Smt. Shubhangi R. Jambhekar, Audit Inspector Gr.II

In terms of foreign Trade Policy, Govt of India, MbPT is entitled to receive Duty Free Credit Scrip @ 5% on Transport Services. Accordingly, MbPT received Duty Free Credit Scrip worth around Rs. 20.70 Crore from the Director General of Foreign Trade under SEIS, under the Foreign Trade Policy 2015-20 on the basis of Income for the year 2016-17. This Duty Free Credit Certificate is valid till 30.07.2020 and is transferable.

Smt. Shubhangi R. Jambhekar, attended this work very promptly at all level including submission of application, attending to deficiencies raised by DGFT and continuous follow-up with DGFT to receive the certificate and finally receipt of Rs. 20.70 crore value Transferable Duty Free Credit Scrip.




Shri Manoj Chinchore Sr. Grade D'Man, SPA.

(a) Shri Manoj Chinchore, has contributed immensely information of MbPT as SPA for 966.30 ha area under MR&TP ACT 1966. He has independently handled the preparation of drawings, calculation of areas, superimposition of Revenue records, liaison with Town Planning and Development Dept. of Govt. of Maharashtra and got the order of SPA.

(b) He is well conversant with MbPT lands. He also helped in alignment of proposed Metro passing from MbPT. He is preparing architectural drawing for various building, and layouts for obtaining building permissions. He collected all revenue records, prepared mosaic of all CTS sheets for the MbPT land particularly for SPA area.

# महिला सक्षमीकरण

श्रीमती शु.गि. पटवर्धन
वरिष्ठ उप सचिव

सालाबादाप्रमाणे यंदाही आपल्या पोर्ट ट्रस्ट मध्ये 8 मार्च महिला दिन उत्तमप्रकारे साजरा झाला. आता एवढे वर्षे मी पहाते आहे की स्त्रियांचा हा महिला दिन साजरा करण्या मागची मानसिकता कृशी बदलत गेली, त्याबद्दल थोडे लिहिते.

माझ्या लहानपणी स्त्रीमुक्ती दिनाच्या भाषणात हुंडाबळी (स्टोव्हचा भडका), मुलगा होण्यासाठी स्त्रीने केलेले अथक प्रयत्न व सासरच्या लोकांनी तिचा केलेला छळ, मुलीबाळींना फूस लावणे, मुलाचे व्यंग लपवून सुनेला फसवणे हे सर्रास चांगल्या/मध्यम वर्गीय घरांतून सुध्दा होत असत व त्याचे प्रतिक म्हणूनच की काय महिला दिनाला फक्त ह्या संबंधी विचारांचे आदान प्रदान करण्याचे व्यासपीठ म्हणून वापरले जायचे. एवढेच कशाला लोकल प्रवासामध्ये पूर्वी सासू आणि सुनेचा छळ ह्या संबंधी कित्येक वेळा हुंदके किंवा डोळे पाणावलेही जायचे आणि ह्याबद्दलचे विषय खूपच चघळले जायचे. मी एकदा चिडून म्हणाले होते की "गप्प बसा गं तो global topic आहे. 'Lady Diana' ला पण तो चुकला नाही हं". नोकरी करत असून सुध्दा स्त्री घरासाठी, कुटुंबासाठी सकाळी 5 वाजल्या पासून रात्री 10 वाजे पर्यंत वणवण करायची कारण अपराधी भावना. परंतु हल्ली अपराधी भावना खूपच कमी कमी होत आहे व कात टाकत टाकत नोकरीकडे केवळ अर्थाजनासाठीच नव्हे तर विचारांच्या, स्वच्छंदी मोकळ्या आकाशाकडे बघण्याच्या हेतुने बघू लागली आहे.

स्त्री मुक्तीचा पुढला प्रवास म्हणजे आताच्या नवीन मुलींनी करियरमध्ये केलेले अग्निदिव्य व सर्व माध्यमांमध्ये अशा करीयरमध्ये वेगवेगळ्या वाटा चोखळणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या जातात व त्या मध्ये महिला सबलीकरणाचा बहुचर्चित शब्द म्हणजे 'Breaking the Glass'.

8 मार्चच्या महिला दिनाच्या निमित्ताने जुन्या मैत्रिणींच्या गप्पा picnic मध्ये रंगात आल्या होत्या. एक मैत्रिण म्हणाली 'ए आपण केला का गं ग्लास Break. दुसरी मैत्रिण हसून म्हणाली, 'आपले professional qualification झाल्यानंतर लग्नाच्या बाजारात "सरकारी/बँकेच्या नोकरीतली मुलगी" हवी असायची सर्वांना. त्यामुळे अशा नोकऱ्या आपण पण शोधल्या व संध्याकाळी 7 वाजता घरी पोहचल्यावर हाश हुश्श करत वर्षानुवर्षे गॅसवर कुकर चढवून सासरच्या लोकांची मनिषा नकळतपणे पूर्ण केली. झटपट स्वयंपाक करुन सर्वांचे डबे भरुन तडतड केली. आम्ही एक मिनिटात पोळी करायचो अशा टोमण्यांना आमच्या पिढीने टोले पण हाणले होते की आम्ही एक मिनिटात एक file clear करतो हं! दुसरे म्हणजे आपल्या वेळी सासरच्या लोकांची ठाशीव मते नवीन आलेल्या सुनेला लवकरात लवकर करण्याची लगबग असायची. त्यामुळे तिला 'आपलीशी' न करता 'सासर छाप' करायची असा बेत असायचा. त्या मुळे शनिवार, रविवार दारचे/गावचे पाहुणे, व्रतवैकल्ये, सणवार हे efficiently केल्या सारखे दाखवून व त्या विरूध्द आवाज आमच्या पिढीने उठवला. त्याच दरम्यान Income Tax मध्ये महिला नोकरदारांना थोडी सूट दिली जायची'. तेव्हा आम्ही मैत्रिणी हसायचो आणि म्हणायचो की सरकारने घरोघरी स्त्री पुरुष समानता नाहीये. त्याचीच जणू दखल घेतली आहे. घरातील पुरुष वर्गांनी स्त्रीला मदत केलीच पाहिजे असा आक्रोश, ठणठण ही आम्ही खूपच केली पण ते व्यर्थ नाही गेले बरं! ह्यामुळे स्त्री पुरुष समानता व व्यक्ती स्वातंत्र्याची गरज आणि त्यांचे महत्त्व पुढल्या पिढीतल्या मुली नकळत शिकत गेल्या. त्यामुळे आम्ही professional होतो पण career वैगेरे म्हणता येईल असे काही घडले नाही.

स्त्रिया पूर्वी नोकरी करत नसल्यामुळे तिला आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यतर नव्हतेच पण घरी किंवा दारी नातेसंबंधा मध्ये औपचारिक संबंध पाळायचे म्हणजे काय हे पण माहित नव्हते. त्या मुळे घरामध्येच भावनिक गुंतवणुक होऊन स्वयंपाक घरातच फक्त राजकारण करुन अजून दुःखी–कष्टी होत असत पण हल्लीच्या मुलींना कार्यालयात एवढे माणसांचे नमुने बघितल्यामुळे तसेच करीयर मध्ये मॅनेजमेंटमध्ये औपचारिक संबंध याचे कित्ते गिरविल्यामुळे प्रत्येकाचा स्वभाव कार्यालयात वेगळा असणार हे पक्के कळल्यामुळेच कार्यालयात तसेच सुनेचे नाते देखील स्त्री formal पध्दतीने सांभाळते.

पूर्वीच्या काळची बदनाम सासू, नणंद नामक स्त्री आता बदलली आहे व बऱ्यापैकी formal नाते संबंध सर्वजणीच सांभाळू पहात आहेत किंवा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे हल्ली स्त्रीला घरी 'सून friendly' 'सासू friendly' वातावरण मिळते आहे. तिच्याकडून पै–पाहुणे, व्रत–वैकल्ये तसेच 7 च्या आत घरी यायची सक्ती केली जात नाही. बाहेरगावी कामा निमित्त जाणे हे गैर–संशयास्पद वाटत नाही.

आता हेच बघाना लग्नाच्या संबंधी हल्लीचे Matrimonial जाहिरातीतले नवे शब्द 'Find equal partner' आणि 'कुंडली जुळेल पण स्वभाव जुळेल का'? तसेच 'live–in', 'Break up' चा cake/party हे नवीन concept बघून स्त्रियांचा मानसिक छळ कमी झालाय व आचार विचारांचे स्वातंत्र्य तिला आता आले आहे. याबद्दल खूपच हायसे पण वाटत आहे.

मला वाटते की स्त्रीयांच्या मानसिकतेचा सबला होण्याचा प्रवास एकदम चित्तथरारक घटना क्रमांनी पुढे सरकला मात्र पुरुषांची मानसिकतेचा प्रवास खूपच हळू झाला. हसण्यासारखंच आहे की पूर्वी घरकामात सतत राहिल्यामुळे आम्ही मैत्रिणी म्हणायचो, पूर्वीच्या काळात पुरुष वर्ग शेती करायला शेताची अवजारे घेऊन जायचा व आताच्या काळी



आपले नवरे ऑफिस मध्ये बायकोने केलेला डबा घेऊन जातात एवढाच काय तो फरक! हल्ली स्त्रीच्या प्रभावी कर्तृत्त्वामुळे तसेच हिरवी पिवळे नेलपेंट बघुन, रुबाबदार formal dress, दागिन्यांची नवी नवी पध्दती बघून पुरुष वर्ग जरी थोडासा बिचकला तरी स्वतःला सावरुन घेऊ लागला आहे. पुरुष मानसिकता खळबळून जागी झाली आहे व घरकामात मदत करणे म्हणजे कमीपणा नाही असे मानू लागलाय. तसेच तिच्या दमदार कर्तृत्वामुळे कार्यालयात बरोबरीने किंवा काकणभर जास्त पध्दतशीरपणे काम करताना बघुन पुरुष वर्गाची स्त्रियांची टिंगल करण्याची प्रवृत्ती आता कमी झाली व तिला आता कमी न लेखता आधीच्या पिढीला जो मान–सन्मान अपेक्षित होता तो आता मिळू लागला आहे. तसेच घरी स्त्रीवर अन्याय होऊ नये म्हणून तसेच कार्यालयात लैंगिक शोषण होऊ नये म्हणून कायदे तिच्या बाजूने भक्कम झाले असल्यामुळे या विषयांचे त्रास देखील आता कमी होऊ लागले आहेत. म्हणजेच पूर्वी तिला घरीदारी गृहित धरले जायचे, तिला आता समाज जबाबदार, कर्तृत्त्ववान 'माणूस' म्हणून स्वीकार केल्याचे सुंदर चित्र आता सर्रास दिसायला लागले आहे.

आपल्या आज्या–पणज्या कर्तृत्ववान असूनही त्या 'चूल व मूल' मध्ये गाडल्या गेल्या परंतु प्रत्येक पिढीगणिक आधीच्या पिढीच्या तुलनेत अवहेलना तसेच दुखः पुढल्या पिढीत कमी झाल्या. समाज प्रवर्तन म्हणजे काही Two minutes Maggie नसतेच. दहिहंडीच्या खेळाप्रमाणे किंवा त्या सिध्दांता प्रमाणे मला वाटते आमची पिढी second last level मध्ये असावी त्यामुळे पुढली स्त्री सर्वच ठिकाणी म्हणजे कार्यालया मध्ये तसेच घरी equality, liberty, fraternity हा प्रवास आत्ताशी सुरु झाला आहे. म्हणजे सुनिल गावस्करने जे काही कर्तृत्व सिध्द करुन दाखवले व जे काही मापदंड प्रस्थापित केले, त्या अनुभवांवर सचिन तेंडुलकरने ते जुने मापदंड तर ओलांडलेच परंतु अजून प्रगल्भ केले. त्या प्रमाणे आमच्या पिढीने शिक्षण झाल्यावर सर्रास नोकरीचा मार्ग पत्करला व यामुळे घरीदारी असे वेगवेगळे संघर्ष केल्यामुळे पुढल्या मुलींना कवच फोडुन आकाशात उत्तुंग भरारी मारणे हे सोपे झाले. आर्थिक समानतेमुळे आलेल्या सामाजिक भानामुळेच की काय आताच्या मुलींना घरी पण व्यक्ती स्वातंत्र्य आणि 'career' करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे व त्यामुळेच त्यांनी career मध्ये 'Breaking the Glass' ही स्त्री मुक्तीची पुढली level सर केली आहे.

जे काही सामर्थ्य स्त्रीने आता मिळविले आहे ते त्यांनी जतन करावेच व त्याचा वारसा व स्वाद, पुढल्या पिढीतील मुलींना देऊन संधीचे अजून सोने करावे. त्यामुळे खऱ्या अर्थाने "मुलगी शिकली प्रगती झाली" हे आता स्वप्न राहिले नसून लवकरच पूर्णतः सार्थ होईलच असे ठाम विश्वासात्मक चित्र दिसत आहे.

आताच्या नुकत्याच आपल्या पोर्ट मध्ये झालेल्या महिला दिनानिमित्त केलेले स्त्रीचे आविष्कार म्हणजे कला, सामर्थ्य, महिला सक्षमीकरण झाल्याचा उत्तम बदल आहे.



# सबलांचे अस्तित्व ?

अनुजा पांचाळ
(डेप्युटी प्लानर, मास्टर प्लानिंग सेल)

मागील काही दिवस जागतिक महिला दिन व सप्ताहाच्या निमित्ताने मेसेजेस, लेख, कविता यांचा खूप वर्षाव झाला, स्त्रियांवर स्तुतीसुमने उधळली गेली, बऱ्याच ठिकाणी 'विमेन्स डे सेलेब्रेशन' निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले, महिलांचे सत्कार सोहळे आयोजित केले गेले. त्यानंतर त्यावर विनोद, जोक्सही झाले. असो.....

त्यानिमित्ताने अलीकडेच पाहिलेल्या 'आनंदी **गोपाळ'** या चित्रपटाचा संदर्भ देऊन काही विचार मांडावेसे वाटत आहेत. चित्रपटाबद्दल काय  बोलावे. एक अप्रतिम कलाकृती!! शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या एका धेय्यवेड्या दाम्पत्याच्या संघर्षाची व स्वप्नपूर्तीची थक्क करणारी यशोगाथा आणि त्यासह त्यांचा सहजीवन प्रवास. सारेच विलक्षण !!  चित्रपटाच्या शेवटी साकारलेला कर्तृत्ववान महिलांचा कोलाज पाहताना तर सर्वांगावर रोमांच उभे राहिले व आपणही एक 'स्त्री' आहोत याचा सार्थ अभिमान वाटला.

पण या साऱ्यातही मनावर ठसले गेले ते गोपाळराव जोशी !! आनंदीबाईनी उच्च शिक्षणासाठी एकट्या परदेशी जाण्यास नकार दिल्यावर गोपाळरावांनी ज्या प्रचंड प्रोत्साहक शब्दांत आनंदीबाईंना बळ दिले ते उद्गार मनावर कोरले गेले, ते काहीसे असे की, 'तुम्ही शिक्षण घ्यावेत असा माझा हट्ट होता पण तुम्ही तर शिक्षणात मला मागे टाकून खूप पुढे निघून गेलात. ज्यावेळेस तुम्ही डॉक्टर होऊन यशाच्या शिखरावर उभ्या असाल त्यावेळेस तिथून तुम्हाला मी इवलासा दिसेन. पण तेव्हा मी खऱ्या अर्थाने धन्य होईन. मग तो माझ्या आयुष्यातील अखेरचा दिवस असला तरी चालेल'. आणि हे फक्त उक्तीतूनच नव्हे तर कृतीतून बोलणारे, लग्न ठरवताना पत्नीने लग्नानंतर शिक्षण घ्यावे ही एकमेव अट ठेवणारे, पत्नीला अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून भल्या पहाटे उठून घरातील सर्व कामे (आजही जी फक्त स्त्रियांनीच करावीत अशी समजली जाणारी ) स्वतः करून मग स्वतःच्या नोकरीला जाणारे, स्वतःची नोकरी गेलेली असतानाही  पत्नीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून तिला उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवणारे गोपाळराव जोशी पाहिले अन् वाटले की असे पुढारलेल्या विचारसरणीचे गोपाळराव प्रत्येक आनंदीच्या आयुष्यात असले पाहिजेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातही आपल्या सहचारिणीला शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करणारे किंबहुना तसा हट्ट धरणारे, तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी तिला विश्वास देणारे किंबहुना ते स्वप्न स्वतः जगणारे, त्यासाठी तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे 'गोपाळराव जोशी' काय किंवा 'महात्मा फुले','न्यायमूर्ती रानडे' काय, कुठे ही पुरोगामी विचारांची मंडळी आणि कुठे आजच्या स्वातंत्र्य मिळून 7 दशके ओलांडून गेल्यानंतरच्या सुशिक्षित पुढारलेल्या समाजात राहणारी व  स्वतःला 'well–qualified', 'tech–savhy' म्हणवून घेणारी परंतु विचारांनी मात्र अजूनही प्रतिगामी, जुनाट वळणाची असणारी मंडळी जी अजूनही आपल्या बायकोला लग्नानंतर फक्त घर–संसार सांभाळण्यास प्रवृत्त करतात, मग 'ती' कितीही शिकलेली असली तरीही; 'आपल्याला काही गरजच नाही तुझ्या नोकरीची' असे म्हणून बायकांना फक्त घरकामाला जुंपतात. काही नवरे तर बायकोची प्रगतीही सहन करू शकत नाहीत, बायको आपल्यापेक्षा जास्त कमावते हे पचनीच पडत नाही कित्येक सो–कॉल्ड 'Educated' नवऱ्यांच्या. आजही कित्येकजण ठरलेली लग्न मुलीकडून अवाजवी मागितलेला हुंडा न मिळाल्याने मोडतात; त्यावेळेस मुलीमध्ये असलेले सद्गुण, तिचे शिक्षण, संस्कार, सुस्वभाव हे सारे अश्या महाभागांच्या नजरेत काडीमोल ठरते. कित्येकांच्या घरी अजूनही मुलगा व मुलगी यामध्ये झुकते माप वंशाच्या दिव्यालाच दिले जाते. पूर्वीच्या काळी जेव्हा बायका अशिक्षित, अडाणी होत्या व घराच्या व चार भिंतींपुरतेच त्यांचे विश्व होते तेव्हाच त्यांच्या संघर्ष वेगळा होता आणि आता त्या शिकल्या, घराचा उंबरा ओलांडला, प्रगतीच्या कक्षा रुंदावू लागल्या व सर्व बंधनांच्या चौकटी मोडू पाहू लागल्या तेव्हा त्यांना वेगळ्या स्वरूपाच्या संघर्षाला सामोरे जावे लागत आहे. स्त्रीचा संघर्ष काही अजूनही संपलेला नाही. 21st century त राहणाऱ्या तुमच्यापैकी कित्येकांना कदाचित ही अतिशयोक्ती वाटेलही पण मी माझ्या आजूबाजूला पाहिलेल्या– अनुभवलेल्या घटनांतूनच हे विचार मांडत आहे.

घर–संसार आणि करियर यामध्ये तडजोड करण्याची वेळ येते तेव्हा ती नेहमी पत्नीलाच का करावी लागते? लग्नाच्या बाजारातही वधू नेहमी वरापेक्षा शिक्षण–करियर– कर्तृत्व या साऱ्यां बाबतीत नेहमी डावीच का लागते? आणि एखादी जर उजवी ठरलीच तर नाकाला मिरच्या झोंबल्यासारखे होते काहींना. पत्नीचे यश खरंच का पतीला झाकोळून टाकते? असे कित्येक प्रश्न सभोवारच्या परिस्थितीकडे पाहिले की मनात थैमान घालतात अन मग वाटते की, ''नको आम्हाला एका दिवसाचा मान–सन्मान, नको देवीची उपाधी, नकोत महिला दिनाचे सत्कार सोहळे–समारंभ. हवीये फक्त 'ती'च्या 'अस्तित्वाची' ओळख, 'तिला' हवीये फक्त 'त्याची' निखळ साथ !! मग तो पिता असो, भ्राता असो, पति असो, मित्र असो वा पुत्र''

एका यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असे आपण नेहमी म्हणतो – ऐकतो पण 'एका **यशस्वी स्त्रीच्या मागे एक पुरुष खंबीरपणे उभा आहे'** हे वाक्य आपल्या समाजात जेव्हा सर्वार्थाने स्वागतार्ह होईल तो दिवस खऱ्या अर्थाने 'स्त्री– पुरुष समानते'चा दिवस असेल. मग महिला दिनासारखे सोहळे अन Events करण्याची गरजच भासणार नाही.

अर्थात, जशी नाण्याला नेहमी दुसरी बाजूही असते तसेच बरेचसे पुरोगामी विचारांचे, संवेदनशील पुरुषही आजूबाजूला आहेत, पाहिलेत, अनुभवलेत; जे आपल्या घरातील स्त्रियांना तर प्रोत्साहन देतातच, पण समाजातील आजूबाजूच्या स्त्रियांनाही आदराने, सन्मानाने वागवतात. स्त्रीदाक्षिण्याची जाणीव असणारे पुरुषही समाजात वावरताना दिसतात पण तरीही अशी संख्या बोटावर मोजण्या इतकीच परंतु चित्र हळूहळू बदलत आहे आणि ते आशादायी आहे.

आणि हो, या साऱ्यात आपण स्त्रियांनीही  'स्वातंत्र्य' आणि 'स्वैराचार' या दोहोंतल्या अगदी हलक्या पुसटश्या रेषेचे भान मात्र सदैव ठेवले पाहिजे. ही आपली नैतिक जबाबदारी !!

# सक्षम महिला : एक नवा अनुभव

चित्रा नानिवडेकर
नर्सिंग सिस्टर

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आमच्या स्त्री सखी मंडळाने काहीतरी वेगळे करायचे ठरवले आणि आम्ही त्या दृष्टीने चर्चा करत होतो. एक सखी म्हणाली आपण पाककला स्पर्धा ठेऊ, दुसरी म्हणाली आपण फॅशन परेड ठेऊ, कोणी नाटक, कोणी गायन वैगरे पर्याय मांडले. मी तशी स्त्रीसखी मध्ये नवीनच असल्याने गप्प त्यांच्या चर्चा ऐकत होते. आमच्या मंडळाच्या मुख्य डॉ. पारीख मात्र माझ्याकडे वळत म्हणाल्या "तुम्हीं काही सुचवा तुम्हीं सोशल वर्करच्या पदवीधर आहात तुमची मतं आम्हाला नेहमीच स्वागतार्ह असतील".

मी हुरुपाने म्हटले मॅडम मला असे वाटते आपण दिव्यांग महिलांना एकत्र बोलावून हा दिवस साजरा केला तर जास्त चांगलं होईल. म्हणजे आपत्या सखींचेच कार्यक्रम पण ते नेहमीच्या बायका, गृहणी आणि दिव्यांग सगळ्या एकत्र येतील बघा तुम्हांला पटतेय का ? डॉक्टर तर एकदम सहमत होत म्हणाल्या खरच खूप छान कल्पना आहे. आपण आपल्या कार्यकर्त्यांना कामाला लावू आणि अश्या महिलांना, मुलींना आमंत्रण देऊ. मी म्हटलं माझ्या ओळखीच्या संस्थेत काही मैत्रिणी आहेत त्यांना सांगते, खरच आम्हीं त्याप्रमाणे आखणी करायला सुरवात केली.

आठ मार्च उजाडला मला खूप धाकधूक वाटत होती की आपण नवीनच काहीतरी ह्या संस्थेत सुरु करतोय पण ते यशस्वीपणे पार पाडू शकू कां ? ठरलेल्या वेळेनुसार चार वाजता आमच्या सगळ्या सख्या एकेक करुन जमायला सुरवात झाली. सगळ्या जणी अगदी ठेवणीतल्या साड्या, एकदोन दागिने आणि केसात गजरे वैगरे माळून येत होत्या, त्यांनी निमंत्रित केलेल्या वस्तीतील गृहिणी सुध्दा उत्साहाने नटून थटून येत होत्या. तेवढयात मी सुचवलेल्या "अपंग स्नेही" मधून मंजू व्हील चेअर घेऊन येत होती, आमचे कार्यालय पहिल्या मजल्यावर होते आणि इमारतीला लिफ्ट नव्हती. तिची व्हीलचेअर वर कशी न्यायची ? मला स्वतःलाच इतके लाजल्या सारखे झाले कि आपल्या हे लक्षात कसे नाही आले. पण मंजू मात्र एकदम शांत होती. मी पुढे येत तिला म्हटले सॉरी मंजू अग ही गोष्ट माझ्या लक्षातच आली नाहीं आता तू वर पर्यंत कशी येशील गं ?

ताई तू नको काळजी करुस, अग तुझ्याच काय आमचे हे दुखः कधीच कोणाच्या लक्षात येत नाहीं म्हणून मी कुबड्या कायम बरोबर ठेवते. रेल्वे, बस मध्ये कुठेच आमच्या साठी वेगळी सोय नसते गं, सार्वजनिक ठिकाणी सुध्दा आमचा विचार कधी त्यांच्या डोळ्यासमोर नसतोच पण आता कुठे लोकांमध्ये थोडी थोडी जागरुकता येऊ लागली आहे. पण आज मला तू येथे बोलावून ह्या महिलांमध्ये मिसळण्याची संधी दिलीस हेच खूप मोठे आहे माझ्यासाठी. तेव्हा तू वाईट वाटून घेऊ नकोस असे म्हणत तीने कुबड्यांच्या साह्याने जिना चढायला सुरवात सुध्दा केली.

तेव्हड्यात गतिमंद मुलींची एक ग्रुप हसत हसत समोरुन येत होता. माझी एक मैत्रीण श्रीमती मेनन त्या संस्थेत आहेत तीने अवर्जून सात आठ जणींना आमच्या मेळाव्याला आणले, त्यातील एकीने चटकन मंजूचा हात धरुन तीला जिना चढायला मदत केली. खरचं यांचे प्रश्न यांच्याच पटकन लक्षात येतात. दृष्टी हीन, दृष्टी मंद अश्या चौघींना घेऊन माझी बहिण सुचिता आली होती, तर कर्णबधीर शांता आधीच कार्यालयात पोहचून हातवारे करुन आणि बोटांने आपल्या मैत्रिणीं बरोबर छान गप्पा मारीत मिसळली होती. संस्थेच्या संचालिका शारदाताई जरा दूरदूरच फिरत होत्या कारण माझा हा अपंग मेळावा त्यांना फारसा पसंत नव्हता असं माझ्या कानावर आले होते, पण मी तिकडे दुर्लक्ष केलं.

कार्यक्रम सुरु झाला आधी जुन्या कार्यकर्त्यांच्या जमलेल्या महिलांनी काही गाणी, नकला सादर केल्या, नंतर गतिमंदांच्या ग्रुप मधून आलेल्या महिलांनी उत्तम नृत्य सादर केले, कर्णबधीर मुलींनी सुंदर कवायत करुन कार्यक्रमाला एक उंची प्राप्त करुन दिली आणि दृष्टिहीन मुलींनी सुंदर गाणी सादर करुन सगळ्यांची वाहवा घेतली. सरते शेवटी मंजू, डॉक्टरांनी आग्रह केला म्हणून बोलायला उभी राहिली आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्त्रीसखी मंडळाने आमच्या सारख्या समाजाने उपेक्षित ठेवलेल्या महिलांना विशेष मान देऊन बोलावले त्याबद्दल मी संस्थेच्या कार्यकर्त्यांचे आणि आमच्या चित्राताई चे आभार मानते कारण ठिकठिकाणी महिला मेळावे होतात पण इतक्या मानाने आम्हाला कधीच कोणी बोलवत नाहीं. समाजात अजून धडधाकट महिलांचेच प्रश्न सुटले नाहीत म्हणून कदाचित कोणाला आमच्या सारख्या अपंग महिलांना बालावणे सुचत नसेल, पण आम्ही अपंग आहोत यात आमचा काय दोष ? आम्हीं काही देवाकडे असे जिवन मागितले नव्हते केवळ निसर्गाच्या काहीं बदलां मुळे आम्ही ही शिक्षा सहन करुन आमचे जिवन सोपे करण्याचा प्रयत्न करतोय नां ? आम्हाला सहानुभूती नको, तुमची कींव तर अजिबात नको पण सन्मान द्या आणि आमचे प्रश्न समजावून घ्या. परदेशात अपंग, दिव्यजन डोळ्या समोर ठेऊन त्यांच्यासाठी बस–ट्रेन मध्ये विमानतळावर सोई केलेल्या असतात असे म्हणतात पण आपल्या शासनाचे सुध्दा फारसे लक्ष आमच्यासारख्या माणसांकडे नाही कारण आमचे मुलभूत प्रश्नांकडे सुध्दा गांभिर्याने पाहिले जात नाहीं. साधे सार्वजनिक वॉशरुम चे उदाहरण घ्यायचे झाले तर व्हीलचेअर जायला सुध्दा जागा नसते. कुबडया घेऊन जाता येत नाहीं कारण फरशीवर पाणि सांडलेले असते, घसरण्याचा धोका असतो, साधा कमोड सुध्दा नसतो. अगदी अलिकडे कर्ण बधीर, अपंग, नेत्रहिन यांसाठी वेगळा डबा असतो पण तेथे सुध्दा धडधाकट माणसं घुसून अरेरावी करतात.लग्न समारंभात बुफेमध्ये अपंगाचा विचार चुकुनही कोणा यजमानांच्या मनात येत नसेल का हो ? आम्हीं आमच्या कुबड्या सांभाळत जेवणार कसे ? आज मी इकडे दोन गाड्या बदलून आले कारण मला या स्त्रीसखी सारख्या संस्थेच्या मुख्य मॅडम डॉ. पारीख यांना विनंती करावयाची होती कि, त्यांनी जसे तळागाळातील मजूर कामकरी महिलांचे प्रश्न हातात घेऊन त्यांना न्याय मिळवून दिला तसेच आमच्या सारख्या अपंग महिलांचे पण प्रश्न हातात घेऊन त्यांना न्याय मिळवून द्यावा व अपंग महिलांचे पण प्रश्न समजून त्यांची दखल घ्यावी ही कळकळीची विनंती. पुन्हा एकदा इकडे बोलावल्या बद्दल सगळ्यांचे आभार.

आमच्या मॅडम तर मंजूच्या भाषणाने खूपच प्रभावित झाल्या होत्या, तिला तर त्यांनी आश्वासन दिले की नक्की पुढच्या आठ मार्च पर्यंत आपण या प्रश्नांच्या मागे लागू पण त्यासाठी आधी मी थोडा अभ्यास करीन आणि तुम्हां सगळयांच्या समस्या समजावून घेईन. पुढील वर्षी या पेक्षा मोठा सोहळा आपण मोकळ्या मैदानावर ठेऊ हा माझा शब्द आहे. माझ्या धडपडीचे सार्थक झालं. प्रत्येक मुलीला त्यांच्या मुक्कामावर पोहचवून मी वेगळया आनंदाने घरी आले तोच डॉक्टरांनी फोन केला शाब्बास गं !! पहिलाच कार्यक्रम तू छान पार पाडलास आता आपण "अपंग सखी" म्हणून आपले एक दालन उघडू मी तुलाच त्याची मुख्य जबाबदारी देतेय काय ? जमेल नां? नक्कीच मॅडम पण एक सुचवू ? अपंग सखी पेक्षा "सखी दिव्यांग" कसं नां वाटेल ? वां छानच आहे मी समाजकारण विभागात उद्याच दिव्यांगांच्या जीआर बद्दल पत्र तयार करते, आपण लगेच कामाला लागू आणि थँक यू मला इतकी छान गोष्ट लक्षात आणून दिल्या बद्दल.

आमच्या डॉक्टर पारीख यांची ही खासियत होती की त्या ज्याचे श्रेय त्याला देवून टाकत असत. अशा तऱ्हेंने आमच्या जागतिक महिला दिन एका वेगळ्या उंचीने साजरा झाला. तुम्ही सुध्दा पुढल्या वर्षी काहींतरी वेगळी थीम घेऊन साजरा करुन बघा छान वाटेल.

..........



# सागरी कन्यांचा महिला दिन

श्रीमती डेल्फिना कोलासो
सहायक गोदी प्रबंधक

SAGARMALA

यावर्षी महिला दिन एका आगळ्यावेगळ्या (Unique) पध्दतीने मुंबई पोर्ट ट्रस्ट मध्ये साजरा करण्यात आला आणि तो ही 8 मार्च या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या एक दिवस आधीच, म्हणजे 7 मार्च 2019 या दिवशी एखाद्या बंदिस्त सभागृहात हा कार्यक्रम न करता डोमेस्टीक क्रुझ टर्मिनल (DCT) येथिल खुल्या वातावरणात हा दिवस साजरा करण्यात आला. साऱ्यांचा आनंद व उत्साह ओसंडून वाहत होता, जणू साऱ्यांचा चेहऱ्यावर सागराच्या लाटांच उसळल्या आहेत.

डोमेस्टीक क्रुझ टर्मिनल पर्यंत पोहचण्यासाठी सोईचे व्हावे म्हणून वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. साऱ्या महिलांना सुरक्षितपणे नियोजित स्थळी पोहचवण्यात आले. रंगबेरंगी वेशभूषेतील महिलांचा सागर डोमेस्टीक क्रुझ टर्मिनल वर येऊन थडकत होता. त्यात भर म्हणून उन्हापासून वाचविण्यासाठी साऱ्यांना गुलाबी रंगाच्या टोप्या दिल्या होत्या, जणू सागरलाटांवर डोलणाऱ्या होड्याच.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या जमैकाच्या शिपिंग असोसिएशनच्या माजी अध्यक्षा श्रीमती डेनिस, सन्मानिय पाहुण्या म्हणून श्रीमती सुरेखा कीपले,वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलच्या कार्यकारी निरिक्षक श्रीमती आरती राव या जय्यत तयारीत उपस्थित होत्या.

श्री गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरवात झाली. नंतर मुंबई पोर्ट ट्रस्टच्या नागरी सुरक्षा दलाच्या महिला प्लाटून ने मार्चिंग करत मोटर बाईक रॅली ने प्रवेश केला. पुण्यातील मर्दानी पथकाने दांडपट्टा, तलवारबाजी यांचे प्रात्यक्षित केले. 10 ते 15 वयोगटातील मुलींनी वेगवेगळे लक्षवेधी खेळ करुन दाखविले. करमणुकीच्या कार्यक्रमात नृत्य व गाणी यांचा समावेश होता. आयोजकांनी अल्पोहाराची व्यवस्था चोख ठेवली होती. संध्याकाळी 5.30 पर्यंत चाललेल्या भरगच्च कार्यक्रमात श्रीमती डेनीस यांनी बौध्दिक खाद्य दिले. श्रीमती कपिले यांनी महिला दिवस साजरा करण्यामागची भुमिका स्पस्ट केली आणि समाजातील महिलांचे स्थान या विषयी प्रबोधन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संयोगिता ने केले. त्या दिवशी घरी जाण्याची कोणी ही घाई केली नाही. साऱ्याजणी सेल्फी काढण्यात मग्न होत्या.

अल्बर्ट आइनस्टाईन ने म्हटलेच आहे, "Ship are safar in the horbour but they are not built for that" हे किती खरे आहे याची प्रचिती या दिवशी आली. जहाजे ही बंदरात किती ही सुरक्षित असली तरी ती बंदरात बांधून ठेवण्यासाठी तयार केली जात नाहीत, तर त्यांना समुद्रात घालावेच लागते, त्याच प्रमाणे स्त्रिया घरात किती ही सुरक्षित असल्या तरी त्यांना फक्त घरातील जबाबदाऱ्यांसाठी बांधून ठेवण्यासाठी परमेश्वराने निर्माण केलेले नाही, तर त्यांच्याकडील गुणवत्ता, उर्जा, शक्ति (Strength) दाखवून देऊन इतरांना उपयोगी पडण्यासाठी निर्माण केले आहे.

आपण तर साऱ्या सागरकन्या आणि त्याचा प्रत्यय आजच्या या "आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या" निमित्ताने खऱ्या अर्थाने घडवून आलेला होता.

------



# 8 मार्च "महिला दिन"

श्रीमती कल्पना देसाई
सहायक अधीक्षक,
वित्त विभाग

8 मार्च रोजी येणारा महिला दिन आज सर्वत्र मोठया उत्साहाने आपण साजारा करीत असतो. निरनिराळया आस्थापनातर्फे त्यांच्याकडे काम करणाऱ्या महिलांसाठी त्यादिवशी खूप कार्यक्रम आखले जातात. महिलांना या दिवशी भेटवस्तू देण्यात येतात आणि महिलाही एकत्र येऊन त्या दिवशी ''महिला दिनाचा'' आनंद लुटत असतात.

पण 8 मार्च हा ''महिला दिन'' म्हणून साजरा करीत असतांना मला असे वाटते की, आपण या दिवसाचा थोडासा मागोवा घेणे आवश्यक आहे. तरच ह्या महिला दिनाचे महत्त्व आणि औचित्य पुढील काळात टिकविता येईल. अन्यथा तो एक इतर उत्सवाप्रमाणे उत्सव ठरेल.

खरतर ह्या ''महिला दिनाचा'' पायाच मुळी महिला कामगारांवर होणाऱ्या अन्यायातूनच उभा राहिलेला आहे. न्यूयॉर्क येथील वस्त्र उद्योगात काम करणाऱ्या महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत असे, महिलांचे कामाचे तास देखील ठरलेले नसत. कापड गिरणीत काम करीत असतांना त्यांच्या नाका–तोंडात जाणारा कापूस (कापसाचे तंतू) यामुळे येणारे आजारपण, त्यांना देण्यात येणाऱ्या वेतनामधील तफावत, महिलांच्या प्राथमिक गरजांनाही त्या वंचित होत्या आणि ह्या सर्व गोष्टींचा एवढा अतिरेक झाला की एकेदिवशी ह्या कारखान्यातील सर्व महिला एकत्र आल्या आणि आपल्या कारखान्या समोर ''धरणे'' धरण्यास बसल्या व जोपर्यंत आपल्या न्याय मागण्या (कामाचे तास, वेतनामधील तफावत, सुरक्षा उपाय इत्यादी) मान्य करीत नाहीत तोपर्यंत तेथून न हलण्याचा त्यांनी निर्धार केला. त्यासाठी त्यांच्यावर लाठीमारही करण्यात आला पण त्या जराही या गोष्टीपुढे नमल्या नाहीत त्यांनी आपला लढा पुढे चालूच ठेवला आणि तो दिवस होता 8 मार्च 1857.

ह्या 8 मार्चचे सूत्र धरूनच पुढे 1910 साली 8 मार्च रोजी कोपन हॅगन येथे समाजवादी महिलांनी जगातील सर्व महिलांना आमंत्रित करून जागतिक पातळीवर महिला दिन साजरा केला आणि महिलांना त्यांच्या प्रश्नांवर एकत्र आणण्याचे फार मोठे काम केले.


येणाऱ्या पुढील वर्षातच म्हणजेच 1911 साली 8 मार्चच्या दिवशी युरोप खंडातील ऑस्ट्रिया, डेनमार्क, जर्मनी, स्विझर्लंड येथील लाखो महिलांनी आपली सुरक्षितता, स्त्री–पुरूष समानता, मतदानाचा हक्क, समान वेतन ह्यासाठी संपूर्ण जगभरात निर्दशने केली. युरोप खंडात चाललेल्या ह्या चळवळीचा परिणाम रशियामधील महिला चळवळीवरही झाला. तेथील महिलांनी 1913 साली फेबुवारीच्या शेवटच्या शनिवारी हा महिला दिन त्यांच्याकडेही साजरा केला.

आपल्या भारतात ''महिला दिन'' म्हणून कदाचित त्यावेळी ह्याला मान्यता नसेल, पण ह्या सर्व चळवळी होण्यापूर्वीच स्त्रियांच्या शिक्षणाकरीता, हक्कांसाठी व एकूणच स्त्रियांच्या सामाजिक उन्नतीकरीता 1902 सालापासून राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमाबी, रमाबाई रानडे, ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी धोंडो केशव कर्वे हया सर्व मंडळीनी खूप मोठे योगदान दिले होते आणि सर्वात महत्वाचे म्हणेज जगात प्रथम ''मतदानाचा हक्क'' हा भारतातील स्त्रियांना प्रथम मिळालेला आहे हेही आपण लक्षात घ्यायाला हवे. हाही त्या काळात झालेला स्त्री चळवळीचा परिणाम म्हणावा लागेल.

आपल्या देशात ''महिला दिन'' म्हणून 8 मार्च 1943 साली प्रथम मुंबईमध्ये साजरा झाला आणि त्यानंतर 1971 आणि 1975 साली पुण्यात ह्याच दिवशी मोठा मोर्चा काढून स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्यात आली.

संपूर्ण जगभरात स्त्रीयांच्या प्रश्नांवर, अधिकारांवर चाललेल्या आंदोलनांचा, चळवळीचा रेटा लक्षांत घेवून संयुक्त राष्ट्र संघातर्फे सन 1975 साली ''8 मार्च हा जागतिक महिला दिन'' म्हणून घोषित करण्यात आला आणि अश्याप्रकारे अनेक वर्ष स्वतः स्त्रियांनी आपल्या हक्कांसाठी लढत देऊन आपल्या ह्या लढयाला जगभरांतून मान्यता मिळविली. तसेच ह्या लढयांमुळे **महिला वर्गावर** होणाऱ्या अन्यायाला वाचाही फुटली. त्यांच्यासाठी कायदेही करण्यात आले, संपत्तीमध्ये वाटा मिळण्याची तरतूद झाली. महिला आयोग नेमण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक सुविधांबरोबरच त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्यांची दखल घेवून त्याप्रकारच्या सोयीही पुरविण्यात आल्या.

असा हा 8 मार्च ''महिला दिन'' आपल्या ट्रान्सपोर्ट ऍण्ड डॉक वर्कर्स युनियनच्या सहभागामुळेच आपल्या मुंबई पोर्ट ट्रस्टमध्येही सुरू झाला हे विसरता येणार नाही. कारण ''मुंबई पोर्ट ट्रस्ट'' हे आस्थापनच प्रामुख्याने पुरूष वर्गाशी जास्त निगडीत आहे. काही ठराविक विभाग वगळता तशी महिलांची संख्या कमीच आहे आणि अशावेळी ह्या महिलांनी संघटीत होणे व आपले प्रश्न युनियनमध्ये मांडणे खूप आवश्यक गोष्ट होती. युनियनचे प्रतिनिधी म्हणून त्यावेळी मा.श्री.रेवती मोडकरबाई, श्रीमती तांबेबाई हयांच्या सारख्या महिला कामगार प्रशिक्षण वर्ग चालवित असत. महिलांशी संवाद साधण्याचा त्यांचा प्रयत्न असे पण पाहिजे त्या प्रमाणात महिला पुढे येत नसत. ज्या उत्साही होत्या त्यांचे प्रमाण अत्यल्प होते. आणि आपल्या पितृतुल्य अशा कै.कोतवालसोहब, कै.कुळकर्णीसाहेब ह्यांचे असे आग्रहाचे म्हणणे असे महिलांचे प्रश्न सोडवायचे असतील तर तुम्हाला संघटीत होणे गरजेचे आहे. कधीतरी, कुठेतरी तुम्ही सर्वांनी एकत्र यायला हवे आणि त्यांनीच आपल्या युनियनच्या माध्यमातून 8 मार्च हा ''महिला दिन'' साजरा करण्याचा विचार मांडला आणि त्यांनी सुचविलेल्या या कल्पनेतून 1993 साली युनियनच्या पी.डिमेलो हॉलमध्ये हा 8 मार्च हा ''महिला दिन'' साजरा करण्यात आला. त्यावेळी एकूण आपल्या मुंबई पोर्टमध्ये महिलांची संख्या 1400 होती. पण महिला आल्या 36! अर्थात तो पहिलाच प्रयत्न होता. उपस्थित महिलांनाही आपण सगळया एकत्र आलो ह्याचा आनंदच जास्त होता. आपली नेते मंडळी त्यांच्यासमोर आली आणि महिलांना युनियनचे महत्व सांगण्यात आले तसेच महिलांचे हक्क आणि कर्तव्ये हयाची जाणीव करून दिली आणि त्या दिवशी खऱ्या अर्थाने महिलाही काही प्रमाणांत क्रियाशील झाल्या. त्यापुढील दिवसांत त्याचे परिणामही दिसले. त्याच्या पुढील वर्षी 1994 साली 8 मार्च हा ''महिला दिन'' त्यांच्या कामाच्याच ठिकाणी घ्यावयाचे ठरवून तो मुंबई पोर्ट ट्रस्टच्या



कॉन्फरन्स हॉलमध्ये घेण्यात आला. त्यावेळी 84 महिला उपस्थित होत्या. अर्थात बदललेले ठिकाण आणि त्यावेळी अत्यंत क्रियाशील असलेले माझ्या जेष्ठ सहकारी श्रीमती विजया कुळकर्णी, वैशाली सांडभोर, प्रविणा सोनावणे हयांनी त्यावेळी महिलांशी साधलेला संपर्क ह्याचाच तो परिणाम होता. हा ''महिला दिन''साजरा करतांना विविध क्षेत्रात काम करणाऱ्या आणि नावारूपाला आलेल्या महिलांना (उदाः पहिली महिला ड्रायव्हर, कंडक्टर, पोलिस इन्स्पेक्टर, पायलट, ट्रेन चालक) आपण बोलावून त्यांचा सत्कार तर केलाच पण त्यांच्या अनुभवांची देवाण-घेवाण झाली. मुंबई पोर्ट ट्रस्ट प्रमाणे, जे.एन.पी.टीत ही महिला दिन साजरा करण्यात येवून तेथील महिलांशी परिचय करून घेण्यात आला. आजच्या घडीला आपण खूप चांगल्या प्रमाणांत ''महिला दिन'' कधी बोटीवर, कधी खंडाळा, कधी बोटॅनिकल गार्डन अशाही ठिकाणी साजरा करीत आलेलो आहोत. ह्यामागे अनेकांचे श्रम आहेत. मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या पुरूष सहकाऱ्यांचाही मोलाचा वाटा आहे. त्यांनीही फोटोग्राफीसारख्या माध्यमातून स्वतःचा पदरमोड करून ह्या उपक्रमाला हातभार लावलेला आहे.

आपल्या ह्या महिला दिनाला मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अधिकारी वर्गाची उपस्थितीही तेवढयाच उत्साहाने असते. 2008 साली झालेल्या ''महिला दिनाला'' त्यावेळचे डेप्युटी चेअरमन मा.श्री.अशोक बलसाहेब उपस्थित होते. आपल्या युनियनतर्फे दरवर्षी साजरा करण्यात येणारा ''महिला दिन'' हयासाठी आपल्या आदरणिय कै.कोतवालसाहेब, आदरणिय कै.कुळकर्णीसाहेब ह्यांचा मिळणारा पाठिंबा पाहिल्यावर त्यांनी ह्या नेत्यांचे आभार तर मानलेच पण त्यांनी त्यादिवशी जाहीर केले की, ही आमची नैतिक जबाबदारी आहे. तेव्हा ह्यापुढे हा महिला दिन मुंबई पोर्ट ट्रस्टतर्फेच साजरा करण्यात येईल आणि त्या सालापासून आजतागायत ''हा महिला दिन'' मुंबई पोर्ट ट्रस्टतर्फे साजरा होत असतो. अर्थात युनियनचा सहभाग असतोच आणि फक्त आपल्याच युनियनचाच नव्हे तर कै.शांती पटेलसाहेबांच्या युनियनचाही सहभाग असतो. तेथील मा.कॉ.एस.के.शेटेसाहेब, कॉ.अपराज ही मंडळीही तेवढयाच समर्थपणे उभी असतात.

आपल्यापाठी आज 8 मार्च ह्या महिला दिनाबद्दल लिहीत असतांना पुन्हा एकदा ह्या दिवसाचा आपण सर्वांनीच गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे. महिलांसाठी कायदे झाले, सोयी झाल्या, अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर असून पुरूषाच्या बरोबरीने जबाबदाऱ्या उचलत आहेत. तरीही आर्थिक उदारीकरणाच्या ह्या काळात, सर्वत्र, कार्पोरेट क्षेत्रात आणि काही खाजगी क्षेत्रांत मिळणाऱ्या 5 आकडी पगारामुळे सर्वत्र आबादी-आबाद आहे असे दिसत आहे पण तशी परिस्थिती नाही. कार्पोरेट क्षेत्रातील महिलांचे प्रश्न-त्यांचे कामाचे तास, तेथील सुरक्षितता, शारिरीक, मानसिक ताण, स्त्री सुलभ मातृत्वाची ओढ आणि त्याला पडणाऱ्या मर्यादा ह्या सर्वच गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतील. त्याचबरोबर सरकारी नोकऱ्यां चे घटतेप्रमाण, शैक्षणिक धोरणांमुळे बंद पडणाऱ्या स्वभाशिक शाळा, त्यातून ज्यांना पहिला फटका बसतो तो स्त्रियांना. आजही आंगणवाडी सेविका, ग्रामसेविका, हंगामी तत्वांवर काम करतात. तसेच दिवसेंदिवस नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीची होत असलेली दुरावस्था, त्याचा बाग-बागायतीवर होणारा परिणाम, परिणामी शेत मजूर म्हणून ज्यांना जास्त रोजगाराला मुकावे लागते त्याही महिलांच. रोजगार हमीसारख्या योजना बंद होत असतांना फटका बसतो तो ह्याच आर्थिकदृष्टया दुर्बळ घटकाला, प्रामुख्याने त्यातील महिलांना. सरकारी कागदोपत्री कितीही योजना असोत, पण आजही या महिला सदर योजनांपासून वंचित आहेत. ''ना या महिलांना आर्थिक स्थैर्य मिळालेले आहे, ना त्यांच्या भविष्यासाठी कोणतीही तरतूद, ना कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ'' ह्याच्याच अर्थ ''स्त्री'' मग ती कोणत्याही वर्गातील असो सुशिक्षित/अशिक्षित,शहरी/ग्रामिण ती आजही अधांतरीच आहे.

**त्यामुळे हयापुढील काळात ''दीन'' होत चाललेल्या महिलांना पुन्हा एकदा उभारी देण्यासाठी एक वेगळया पवित्र्यात संघटीत होवून उभे रहायला लागेल आणि 8 मार्च हया दिवसाचे महत्व जपावे लागेल.**







# Women's Day 2019

Smt. Amita Mulye
Sr.DCAO

## Empowerment of Women in Mumbai Port Trust & celebration of the Women's day – 8th March 2019

At present, around eight hundred women employees are working in our Port. Nearly fifty of them are holding Senior Positions in various departments like Finance, Medical, Engineering and Administration. The Port is taking good care of our female employees and is providing various statutory benefits including Maternity Leave, Adoption leave, Child Care Leave etc. to them. Woman employees are also deputed to various specialized training courses related to their field / functioning.

The Provisions of Prevention of Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 are well implemented in our organization.

Since 2008, Internal Committee is constituted and is functioning, in port which includes members from various departments and one member from a non-governmental organization.

To facilitate functioning of committee, nodal female officers from each department are also appointed. The Committee has been reconstituted with the approval of Chairman, MbPT in August 2017.

The said Committee deals with all the complaints of sexual harassment and take appropriate action against the persons found guilty. Committing Sexual Harassment is included as misconduct in Mumbai Port Trust Employees (Conduct) Regulations, 1976 and action of imposition of penalty upon guilty employee is taken after following due procedure prescribed as per provisions of Mumbai Port Trust Employees (Classification, Control & Appeal) Regulations, 1976. Vaiorus training programmes are arranged by the Commettee and also by MbPT at Training Center for creating awareness amounst all the employees (men & female) regarding the provisions of the Act.

The Committee submits the Annual Report to the District Officer, Mumbai City Collectorate. The related information is also included in the Performance Profile under 'Human Resources and Welfare Measures' of the Administrative Report of Mumbai Port Trust.

With the initiative of Internal Committee of Mumbai Port Trust, every year International women's day is celebrated in the Port. On this global day various cultural programmes , talent shows, competitions , lectures by eminent personalities on health , social & economic issues etc. are arranged.

This year the day has been celebrated at Domestic Cruise Terminal, with kind approval of the Chairman. The lavish green lawn with presence of historic installations like Watch Tower, cannon shaped Bollards together with a back drop of calm sea was a wonderful experience to all the women employees of MbPT. The Guest of honour Ms. Denise Andrea Lyn Fatt, the immediate past president of the Shipping Association of Jamica made the day literally International women's day for MbPT. The presence of Smt. Surekha Kapile , Sr. Police Inspector, Yellow Gate Police Station and Smt Arati Rao, Inspector Executive, CISF made the occasion very special.

'Mardani Pathak' a group of girls from Pune performed martial arts of Maharashtra (Dandpatta, Talwar-baji etc.) and won hearts of those who were present. The women employees performed marvelous dances and sang melodious songs. An innovative participation of Civil Defense women platoon got standing ovation from the audience. Their marching, bike rally with the flags, firefighting demonstration was a superb performance. The colorful gathering and the talents shown were appreciated by one and all.



# LEGAL POSITION OF INDIAN WOMEN

Suruchi Gurjar
Sr. Legal Manager, MbPT.

SAGARMALA

***THE BEST THERMOMETER TO THE PROGRESS OF A NATION IS ITS TREATMENT OF ITS WOMEN.***
***— SWAMI VIVEKANANDA***

In today's world, women are no behind. They are remarkably present in every field including even the fields in which there were always men in majority such as politics, sports etc.

This position of women in India, their equality, non-discrimination and honor has been achieved by women through a hard way struggle. There have been reformers, social workers, and also certain far sighted and educated women who have contributed to the upliftment of women in India.

The process of getting equal share of stage with men, right to be protected and to be empowered is ever evolving. There have been constitutional and legal rights which have been created for women in India under the Constitution of India and through various legal provisions under different laws of the country.

The Constitution of India grants fundamental constitutional rights to women in India which most importantly include equality before law and also empowers the State to make special provisions for women and children. The Constitution also prohibits the State from discriminating against any citizen on the grounds of religion, race, caste, sex, and place of birth or any of them. The Constitution grants equal opportunity in the matters of public employment to all citizens.

The Directive Principles of State Policy provide for certain principles of policy to be followed by the State which include equal rights to men and women to an adequate means of livelihood and also equal pay for equal work for both men and women. The state shall also make provisions for securing just and humane conditions of work and for maternity relief.

In order to uphold the constitutional provisions, various provisions under different acts have been made specifically for women. These are such legal provisions made for the benefit of women in India which every woman should be aware of.

**DIFFERENT LAWS HAVING PROVISIONS FOR WOMEN:**

1. **Maternity Benefits Act, 1961:**

The Maternity Benefit Act, aims to regulate of employment of women employees in certain establishments for certain periods before and after child birth and provides for maternity and certain other benefits.

By a recent amendment to the Act passed by both the Houses of Parliament in the year 2017, inter-alia, following major amendments have been made:

a. Increased Paid Maternity Leave;

b. Maternity leave for adoptive and commissioning mothers;

c. Work from Home option;

d. Crèche facility.

2. **Equal Remuneration Act, 1976:**

The Equal Remuneration Act, 1976 aims to provide for the payment of equal remuneration to men and women workers and for the prevention of discrimination, on the ground of sex, against women in the matter of employment and for matters connected therewith or incidental thereto.

The implementation of the Equal Remuneration Act, 1976 is done at two levels:

**Central Sphere:** The Act is being implemented by the Central Government in relation to any employment carried on by or under the authority of the Central Government or a railway administration, or in relation to a banking company, a mine, oil field or major port or any corporation established by or under a Central Act.

**State Sphere:** In respect of all employments other than those where the Central Government is the appropriate Government, the implementation rests with the State Governments. In the case of employments where the State Government are appropriate authorities, the enforcement of the provisions of the Act is done by the officials of the State Labour Department. The Central Government monitors the implementation of the provisions of the Equal Remuneration Act, 1976 by the State Governments.

3. **Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013:**

This Act was enacted to provide protection against sexual harassment of women at workplace and for the prevention and redressal of complaints of sexual harassment and for matters connected therewith or incidental thereto.



The Women and Child Development Ministry has also linked its online portal to report complaints of alleged sexual harassment at workplace to all central and state ministries for their speedy disposal. Those who have already filed a written complaint with the Internal Complaint Committee (ICC) or Local Complaint Committee (LCC) constituted under the Sexual Harassment Act are also eligible to file their complaint through this portal.

Apart from above acts, almost all the major labour laws of the country have provisions for better service conditions, equal participation, equal remuneration and for protection and safety of women.

4. **Information and Technology Act, 2000:**

The world is getting closer day by day with the use of so much available social media. While we may have no or very friends in real lives, we have friends across the world who are known to us only through social media, different websites and apps for communication.

Though our presence on social websites has become inevitable to an extent, we should always be taking care of our privacy, dignity and safety. The social media is a new platform for many anti- social elements where a dignity, privacy and safety of women is increasingly being confronted every moment.

Such anti-social elements are indulging in many cybercrimes through fake email ids, fake accounts on many social websites and are committing offences like extortion, blackmailing, sexual exploitation, defamation, incite hate against the community etc. Women who are falling prey to such crimes are not suffering from crime itself but also from mental agony, depression and abuse.

While cybercrimes range from frauds to hacking, the police across the country have been receiving several complaints by women complaining of blackmail.

According to Police, Cyber Crime, Maharashtra, cyber-crimes against children and women account for about 30 per cent and are growing at 100 per cent every year.

The Information and Technology Act, 2000 contains many provisions under which the cyber criminals can be booked for committing cybercrimes. Some of them are publishing or transmitting obscene material (its scope was later widened in which child pornography and retention of records by intermediaries), sending offensive messages through communication service, causing annoyance in electronic form through an electronic communication or sending an email to mislead or deceive the recipient about the origin of such messages (commonly known as IP or email spoofing) are all covered under the Act.

5. **The Indecent Representation of Women (Prohibition) Act, 1986:**

This Act is to prohibit indecent representation of women through advertisements or in publications, writings, paintings, and figures or in any other manner and for matters connected therewith or incidental thereto.

6. **Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act (1994):** The Act seeks to prohibit sex selection before or after conception and prevents the misuse of pre- natal diagnostic techniques for sex determination leading to female foeticide.

7. **Medical Termination of Pregnancy Act (1971):**

This Act provides for the termination of certain pregnancies by registered medical practitioners on humanitarian and medical grounds.

8. **Immoral Traffic (Prevention) Act (1956):**

This Act is for prevention of trafficking for commercial sexual exploitation. In other words, it prevents trafficking in women and girls for the purpose of prostitution as an organised means of living.

9. **Protection of Women from Domestic Violence Act (2005):**

This Act is a comprehensive legislation to protect women in India from all forms of domestic violence. It also covers women who have been/are in a relationship with the abuser and are subjected to violence of any kind—physical, sexual, mental, verbal or emotional.

The Act provides for the first time in Indian law a definition of "domestic violence", with this definition being broad and including not only physical violence, but also other forms of violence such as emotional/verbal, sexual, and economic abuse.



10. **Dowry Prohibition Act (1961):**

This Act aims at prohibiting the giving or taking of dowry at or before or any time after the marriage from women.

11. **Indian Penal Code (1860) and Code of Criminal Procedure (1973):**

These enactments contain provisions to protect Indian women from dowry death, rape, kidnapping, cruelty and other offences. Code of CRIMINAL Procedure has certain safeguards for women like obligation of a person to maintain his wife, arrest of woman by female police and so on.

12. **Hindu Succession Act (1956):**

This Act recognizes the right of women to inherit parental property equally with men.

13. **National Commission for Women Act (1990):**

This Act provides for the establishment of a National Commission for Women to study and monitor all matters relating to the constitutional and legal rights and safeguards of women.

The list of acts and legal provisions contained therein for safety, betterment, empowerment and equality to women is long and is not exclusive.

**LATEST JUDGMENTS RELATING TO WOMEN BY INDIAN JUDICIARY:**

1. **Devotion Cannot Be Subjected To Gender Discrimination, Women Entry Allowed In Sabarimala By 4:1 Majority:**

The Supreme Court delivered one of the most keenly awaited judgment in Sabarimala case by a 4:1 majority, the Court has permitted entry of women of all age groups to the Sabarimala temple, holding that 'devotion cannot be subjected to gender discrimination'.

2. **'Husband Is Not The Master Of Wife', 158 Year Old Adultery Law Under Section 497 IPC Struck Down** [Joseph Shine V. Union of India]:

The Supreme Court struck down 158 year old Section 497 of the Indian Penal Code, which criminalizes adultery, as unconstitutional. The Court however clarified that adultery will be a ground for divorce. It was also stated that if an act of adultery leads the aggrieved spouse to suicide, the adulterous partner could be prosecuted for abetment of suicide under Section 306 of the IPC.

3. **WOMEN IN TERRITORIAL ARMY Kush Kalra V. Union of India:**

In a path-breaking decision, the Delhi High Court opened the gates for women to enter the Territorial Army. "Women are eligible for recruitment and appointment to the Territorial Army under Section 6 of the Indian Territorial Army Act, 1948". A bench of then Acting Chief Justice Gita Mittal and Justice C Hari Shankar held that advertisements imposing a blanket ban on the appointment of women to both departmental and non-departmental battalions of the Territorial Army were without any credible, reasonable or compelling justification for imposing such restrictions.

4. **PREGNANT EMPLOYEE Yogita Chauhan V. Office Deputy Directorate of Education NCT of Delhi:**

Women should be honoured and treated with dignity at the workplace, the Delhi High Court said while asserting that employers should be sympathetic towards pregnant women and mothers. Justice Suresh Kumar Kait observed, "Women who constitute almost half of the segment of our society have to be given due weightage and honoured and treated with dignity at places where they work to earn their livelihood."

5. **Temporary, Ad Hoc And Contract Staff Also Entitled To Maternity Leave, Central Administrative Tribunal:**

In a significant ruling, the Central Administrative Tribunal (CAT) has said that temporary, ad hoc and contract women employees are also entitled to maternity leave and consequent benefits akin to regular staff.

The CAT based its ruling on a Supreme Court judgment of 2000 (3) SCC 224 in the case of unicipal Corporation of Delhi Vs. Female Workers(Muster Roll) and another" which said women who constitute almost half of the segment of the society have to be honored and treated with dignity at cases where they work to earn their livelihood".

6. **Hostel Rules- Not Unfair To Treat Women and Men Differently In Matters Of Safety and Security:**

In a recent judgment, the Madras High Court dismissed a Public Interest Litigation filed by some hostellers challenging the constitutionality of Tamil Nadu Hostels and Home for Women and Children (Regulation) Act, 2014 and the Rules.

The bench comprising Justice S. Manikumar and Justice Subramonium Prasad observed that right of women to have empowerment on the basis of the economic status is altogether different from the mandatory duty of the State to provide security and safety to the women and children. It observed that treating men and women differently in the matter of security and safety cannot be termed as discrimination.

The Court held that "*There is no unfair classification. The difference in treating women and children, in the matter of security and safety, cannot be compared to take of men, and the State Government enacting a special enactment exclusively for regulating Hostels, lodging houses, homes for women and children, has a rational nexus to the object sought to be achieved and thus there is no discrimination, violating Article 14 of the Constitution of India.*"

7. **Daughters Have Equal Rights In Ancestral Property, Even If They Were Born Before Enactment Of Hindu Succession Act:**

The Supreme Court has held that daughters who were born before the enactment of Hindu Succession Act 1956 are entitled to equal shares as son in ancestral property. The ruling was rendered in an appeal filed by daughters challenging a decree in a partition suit, which excluded them from partition.

The Court also observed that 2005 amendment was brought in on the touchstone of equality, thus seeking to remove the perceived disability and prejudice to which a daughter was subjected.

8. **Even If Wife waives off Her Right To Maintenance In Agreement With Husband, Her Statutory Right To Maintenance Under S.125 Of CrPC Can't Be Bartered:**

In a significant judgment, the Bombay High Court has held that even when a wife enters into an agreement with her husband waiving off her right to maintenance, her statutory right to maintenance cannot be bartered, done away with or negatived by the husband by setting up an agreement to the contrary.

There are so many legal provisions and rights to safeguard and empower women and to give a better life to them. It has been seen over the years that the Indian courts are playing vital role in betterment of women of India while aiming to deliver justice. While there are so many constitutional and legal rights for women, women should also be proactive in knowing their rights and seeking justice.

---------

# स्त्री पुरुषन्नम भेदे ! शिवपण एकले नांदे !!

श्री. मंगेश ज. सावंत
लेखा विभाग

संत ज्ञानदेव म्हणतात की, स्त्री पुरुषन्नम भेदे! शिवपण एकले नांदे!!

म्हणजे शिवभक्ती चे स्वरुप वरुन जरी दोन असले तरी त्यांचे तत्व एक आहे. स्त्री पुरुष समानता यापेक्षा वेगळ्या शब्दात सांगता येणार नाही. ज्ञानदेव हे आपणास 12 व्या शतकात सांगतात, म्हणजेच त्या काळात स्त्री पुरुष समानतेच्या दृष्टीने आपण नक्कीच पुढारलेले असणार. भारतीय तत्वज्ञानानुसार अस्तित्वाच्या त्रिकोणाच्या पायाच्या एका टोकाला पायाभूत सुविधा व समृध्दी देणारी लक्ष्मी, दुसऱ्या टोकाला शक्ती देणारी व संरक्षण देणारी महाकाली दुर्गा आणि त्रिकोणांच्या शिरोबिंदुमध्ये ज्ञान, कल्पना देणारी महासरस्वती असते. अशा प्रकारे या तीन शक्तींना महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती असे स्थान दिलेले आहे. पूजा जरी पुरुष देवतांची केली जात असली तरी चर्चा होते ती त्यांचा शक्तीची, त्यांच्या असलेल्या स्त्री शक्तीची स्त्री आणि पुरुष यांच्यात केवळ शरीर भेद नाही तर स्त्री अधिक संवेदनशील, श्रध्दावंत आहे, तिला देवत्वाचे अस्तित्व अधिक जाणवते. पुरुषाचे लक्ष मात्र भौतिकतेकडे, जडत्वावर अधिकार गाजवण्याकडे अधिक असते. त्यामुळेच की काय कालौघात स्त्री पुरुष असमानता वाढत गेली.

ज्या पाश्चिमात्य जगाला आपण पुढरलेले म्हणतो त्या पैकी जवळजवळ सर्वच देशात 20 व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत स्त्री वर्गाला मतदानाचा हक्क नाकारलेला होता. ज्या देशात राणीचे राज्य होते त्या इंग्लड सारख्या प्रगत देशात ही स्त्रीयांना मतदानाचा अधिकार नव्हता. पुरुष प्रधान संस्कृतीचे हे विदारक सत्य होते. या स्त्री पुरुष विषमतेसाठी अन्यायला वाचा फोडण्यासाठी स्त्रिया प्रयत्नशील होऊ लागल्या होत्या. या साठी 1907 मध्ये स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली होती. त्या मध्ये क्लारा झेटकीन या तडफदार जर्मन महिलेने "सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे " अशी जोरदार घोषणा केली. 8 मार्च 1908 ला न्युयॉर्क येथे स्त्री कामगारांनी प्रचंड प्रमाणात निर्दशने केली. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा हक्क या दोन प्रमुख मागण्या होत्या. या अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून स्विकारावा असे ठराव क्लारा झेटकीन यांनी 8 मार्च 1910 ला डेन्मार्क मधील कोपनहेगन या शहरात झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय महिलांच्या परिषदेत मांडला आणि बहुमताने संमतही झाला. त्या नंतरच 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा होऊ लागला. या ठरावानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून 1918 साली इंग्लड मध्ये व 1919 साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले. त्या नंतर पुढे जगभरात 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा होऊ लागला. भारतात मुंबई येथे पहिला महिला दिन 8 मार्च 1943 ला साजरा झाला. पुढे 1975 हे साल युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले. त्या नंतर स्त्रियांच्या समस्या समोर यायला लागल्या, त्या बोलत्या व्हायला लागल्या. स्त्रीवादी चळवळ अनेक अडचणींना सामोरी गेली आणि आज तिने स्वतःला नविन ओळख व दिशा दिली आहे.

महिला मध्ये अपार शक्ती आणि क्षमता आहे. व्यवहारी जगात सगळ्याच क्षेत्रात त्यांनी आपली किर्ती स्थापित केली आहे. आपल्या अथक परिश्रम तसेच दुरदर्शी बुध्दीमत्तेया जोरावर विश्वपटलावर स्वतःची एक ओळख बनविण्यात ती यशस्वी झाली आहे. भारताच्या माजी पंतप्रधान कै. श्रीमती इंदिरा गांधींना त्यावेळचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष शेनालु रेगन आदराने 'एक चतुर महिला' असाच उल्लेख करायच्या. इंदिरांजी केवळ भारतीय राजकारणात नव्हे तर जगाच्या राजकारण क्षेत्रात आपली छाप पाडली होती. मानसिक संवेदना, करुणा वात्सल्य अशा भावनांनी परिपुर्ण असलेल्या अनेक स्रियानी भारताच्या नवनिर्माणामध्ये आपले मोलाचे योगदान दिले आहे. साधारणपणे रणनैतिक अवजारे आणि परमाणु क्षामक मिसाईलवाल्या क्षेत्रात फक्त पुरुषांचे वर्चस्व असायचे. भारताच्या मिसाईल सुरक्षेमध्ये असलेले 5000 किलो मीटर वेध घेणारा मिसाईल म्हणजे "अग्नी–5" या मिसाईलचे संपुर्ण परिक्षण करुन जगाच्या नकाशात भारताचे नावलौकिक करणारी महिला ज्यांना 'मिसाईल वूमन' म्हणुनही ओळखतात त्या म्हणजे डॉ. टेसी थॉमस. निस्वार्थ कर्तव्य बजवण्यासाठी ज्यांना शौर्य पुरस्कार मिळाले, त्याचबरोबर ज्यांच्या अनेकानेक सामाजिक कार्याला जगभरात मान्यता मिळाली, ज्याचा परिणाम म्हणजे आशियाचा नोबेल पुरस्कार म्हणून ओळखला जाणारा 'मॅगसेसे' पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्या भारतीय पोलीस सेवेची प्रथम वरिष्ठ महिला अधिकारी डॉ. किरण बेदी.

मदर तेरेसा यांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहिर, भारतीय सैन्य दलात महिलांचा प्रवेश, भारताच्या राष्ट्रपती पदी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची निवड गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना भारतरत्न किताब आणि असे अनेकानेक विक्रमी गोष्टी महिलांच्या नावावर आहेत. स्त्री ही त्याग, नम्रता, श्रध्दा व सुजाणपणा यांची मुर्ती आहे. ती कोणत्याच बाबतीत कमी नाही. पारंपारिक रित्या पुरुषांची समजली जाणारी क्षेत्रे महिला काबीज करत आहेत. झाशीची राणी लक्ष्मीबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले यांच्या पावलावर पाऊल ठेवून मीरा बोरवणकर, सुनिता विल्यम, अंजु जॉर्ज, कल्पना चावला, सानिया मिर्झा, मेरी कोम, सायना नेहवाल यांच्या सारख्या महिलांनी आपआपल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवले व गाजवत आहेत. भारताच्या सध्याच्या संरक्षण मंत्री पदी एक महिलाच आहे. श्रीमती सीतारमण, ज्या अगदी समर्थपणे ते पद सांभाळत आहेत. पुलवामा हल्ल्या नंतर पाकिस्तानवर झालेला 'सर्जिकल स्ट्राईक' यांच्याच खंबीर नेतृत्वाखाली झाला, जो प्रसंगी भारत किती प्रखर होऊ शकतो हे उदाहरण जगाला दाखवून गेला. पोलीस, लष्करी दल या



## Dorine Lobo
### Vigilance Officer

श्री. मंगेश सावंत.... पृष्ठ 2,

बरोबर, रिक्षा, ट्रक चालविणे, पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याचे काम करणे, बस कंडक्टर, पत्रकारिता, फायर ब्रिगेड ही क्षेत्रेसुध्दा महिलांनी काबीज केली आहेत. आर्थिक क्षेत्रातही अनेक महिला मोठ्या पदांवर कार्यरत आहेत.

आज महिलांचा विकास झाला आहे पण सर्वांगिण नाही; समाजाचा काही वर्ग खुप पुढे गेला आहे तर काही वर्ग अजूनही मागे आहे. अजूनही खूप स्त्रिया अशिक्षित, हुंडाबळी, अंधश्रध्दा अशा अनेक बंधनात अडकलेल्या आहेत. त्यांचा दिवस कोंबडा बांग देण्या आधीच सुरु होतो व किरकिर वर रात्र संपते या आरशाची एक बाजू खूपच सुंदर व दुसरी तितकीच कुरुप. समाज आजही आपल्या परंपरागत मानसिकतेतुन बाहेर येण्यास तयार नाही. पूर्वी चुल आणि मूल करणारी स्त्री आज त्या जबाबदाऱ्या सांभाळून देखील आर्थिक क्षेत्रात खंबीरपणे उभी आहे पण खरच ती स्वंतत्र आहे? असा प्रश्न पडतोच. आज पुरुषांच्या विखारी नजरा बालिकेपासून वृध्दे पर्यंत सर्वांनाच सहन कराव्या लागतात गर्दीत, समाजात, शाळेत, नातेवाईकांत आज एकटी स्त्री असेल तर ती खरोखरच सुरक्षित आहे का? नोकरीच्या ठिकाणी लोकलमध्ये अपराधी प्रवास करणारी स्त्री सुरक्षित आहे का? तर त्याचे उत्तर दुर्देवाने नाही असच येईल. ही परिस्थिती खेड्यापासून मोठ्या शहरापर्यंत एकच आहे.

यस्य पूज्यंते नार्मस्तु तत्र रमन्ते देवताः

म्हणजेच..... जिथे स्त्रीची पूजा होते तिथे देवाचा वास असतो. परंतु वर्तमानस्थितीत याच्या विपरितच परिस्थिती दिसत आहे. आपली संस्कृती टिकवायची असेल तर स्त्रीचा सन्मान कसा राखला जाईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. आज जर समस्त नारी शक्ती एकवटली व पिडीत महिलांच्या बाजूने उभी राहिली तर तिला त्रास देणारे समाजातील घटक भयकंपित होतील. गरज आहे आवाज उठविण्याची, अन्याया विरुध्द एकत्रपणे लढण्याची. मग बघा कोणाची हिंमत आहे स्त्रियांवर अन्याय करण्याची.

समस्त स्त्री वर्गाला, पुरुष वर्गाचा प्रतिनिधी म्हणून मी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देतो व येणाऱ्या भावी काळात स्त्री अधिकाधीक सुरक्षित राहो, सबल बनो अशी आशा व्यक्त करतो.

............

Womanhood is one of the most beautiful / wonderful phase of life.

As a woman taking care of family household chores and going to office to help the family financially is what most of the women carry out in their day to day life.

I used to always wonder whom do I have as my ideal. But slowly I realized that I myself was my own ideal person in my life.

Doing all the work at home, taking care of the children, doing the office work sincerely with due devotion towards my organization was my aim everyday in the morning. Millions of women who work tirelessly are the ideals which we see daily.

While working in office at times, I used to feel it is not easy to cope up with the huge responsibility of work entrusted. But coming to office on time, working with kindness and sincerity, maintaining good discipline, helping colleagues in doing work, working with great zeal and enthusiasm, all these simple qualities made me an ideal woman for myself as well as for my own colleagues.

Once, a male colleague of mine clapped and said, " No matter how fast the others work, your kept up with them and went all the way". It was great to get such appreciation.

I dedicate these words to all the women who work every day with simplicity to achieve great things.

I am truly proud to be a female employee of my organization i.e Mumbai Port Trust.

------



# # Balance For Better (# समानता)

कु. प्राज्ञा बेलेकर
सहाय्यक कार्यकारी अभियंता
योजना एवं अनुसंधान

नुकत्याच येऊन गेलेल्या मराठी चित्रपटात एक गाणे आहेः

''वाटा वाटा वाटा गं, चालीन तितक्या वाटा गं.... माथी छाया, पायी ऊन, प्रवास माझा उफराटा गं ....''

ते गुणगुणताना मनात विचार आला – खरंच स्त्री म्हणून जगात आपला प्रवास तरी किती वळणावळणाचा आहे! आज आपण स्त्रिया किती सहज म्हणतो, ''परवा महिला दिन आहे, मी अमुक इथे ह्या कार्यक्रमाला जाणार आहे..'' हे मूलभूत व्यक्तीस्वातंत्र्य मिळवण्यापासून ते आज महिला दिन साजरे करण्यापर्यंतचा खूप मोठा प्रवास जगभरातील 'स्त्री'ने अनुभवला आहे. अगदी सुरुवातीला अमेरिकेत पहिला 'राष्ट्रीय महिला दिन' 28 फेब्रुवारी,1909 रोजी साजरा करण्यात आला होता. 1907 साली स्टुटगार्ट येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली. यामधील क्लारा झेटकीन या कम्यूनिस्ट कार्यकर्तीने स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे, अशी घोषणा केली. पुढच्याच वर्षी 8 मार्च रोजी वस्त्रोद्योगातील स्त्रियांना कामाच्या ठिकाणी असलेल्या अडचणींबद्दल एक मोठी चळवळ सुरु झाली, आणि त्याचबरोबर लिंग,वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पात्रता या मुद्यांवरून भेद न करता सर्व प्रौढ स्त्री–पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशीदेखील मागणी करण्यात आली. हा एक ऐतिहासिक उठाव होता, म्हणून 1910 साली कोपनहेगनयेथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, 8 मार्च 1908 रोजी अमेरिकेतील स्त्री–कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, 8 मार्च हा 'जागतिक महिला–दिन' म्हणून स्वीकारावा असा क्लाराने ठराव मांडला, आणि तो पास करण्यात आला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी चळवळी घडून आल्या. त्यांचा परिपाक 1918 साली इंग्लंडमध्ये व 1919 साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळण्यात झाला. अखेर 1910 पासून अधिकृतरित्या '8 मार्च' हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला. 'साजरा' जरी म्हटलं तरी ह्यात मुख्य उद्देश देशपातळीवर स्त्रियांच्या मुलभूत प्रश्नांना वाचा फोडणे, त्याबाबत सक्रीय राहणे हाच होता. त्यानुसार 2010 साली 100वा महिला दिन होऊनही आजही आपल्याला अनेक मूलभूत हक्कांसाठी झगडावे लागते आहे, ही बाब काहीशी विचलित करते. भारतासारख्या पुरुष प्रधान देशात पहिला महिला दिवस मुंबई येथे 8 मार्च, 1943 साली साजरा झाला. पुढे संयुक्त राष्ट्रसंघाने 1975 हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले होते. तिथून पुढे आज आपण 21व्या शतकात प्रवेशलो आहोत.

आजच्या स्त्रीला नुकत्याच खुल्या झालेल्या क्षेत्रां मध्ये उंबरा ओलांडताना तसेच आधीच खुल्या असलेल्या कार्यक्षेत्रांमध्ये अनेक आव्हानं झेलायची तयारी ठेवायची आहे. त्यातलेच एक म्हणजे आपापल्या क्षेत्रातील समानता आणि कामाच्या समान संधी उपलब्ध नसणे.

Balance, म्हणजेच समतोल हे निसर्गाचे तत्त्व आहे. ते जेव्हा बिघडते तेव्हा काही आपत्ती उद्भवते. जेव्हा असमतोल समाजात जाणवू लागतो, तेव्हा समाजमनात काहीतरी ढवळू लागते– मळमळल्यासारखे...आणि सुरु होतो तो लढा. असंवेदनशीलते विरुद्ध. आजही स्त्री–प्रधान संस्थांचे अस्तित्व आहे म्हणजेच काहीतरी असे घडते आहे जे स्त्रियांना खटकते आहे, ज्याविरुद्ध त्यांचा लढा सुरु आहे. जगात अनेक अनिष्ट प्रथा आज धर्म आणि जातींच्या पडद्याआडून फक्त स्त्रियांना डंख करीत आहेत. त्याविरुद्ध आवाज उठवणार्या व्यक्तींनां दडपले जात आहे– हिंसक अथवा इतर मार्गांनी. स्त्रियांची अर्धीअधिक ऊर्जा स्वतःभोवती असलेल्या अदृष्य बंधनांशी झगडण्यात व्यय होते आहे. ही बंधनं स्त्रियांवर बहुधा घरातून, समाजातून,जाती–धर्माने लादलेली आहेत. त्यातूनही तिला आपल्या क्षेत्रात स्वतःला सिद्ध करून दाखवणे हे अपरिहार्य असते. आजच्या घडीला मतदानाचा अधिकार स्त्रियांना Vatican City या देशात अजूनही मिळालेला नाही. मतदानाचा व निवडणुकीला उभं राहण्याचा अधिकार सौदी अरेबियाने स्त्रियांना 2015 मध्ये दिला तसेच वाहन चालविण्याचा अधिकार जून, 2018 मध्ये दिला. आजही इराण देशामध्ये इतर देशांतील स्त्रियांनी (फक्त स्त्रिया, पुरुष नव्हे!) पर्यटक म्हणून गेल्यास देशाच्या कायद्याप्रमाणे हिजाब किंवा डोक्यावर रुमाल/ हेडस्कार्फ परिधान करणे बंधनकारक आहे. याबद्दल एखादीच सौम्या स्वामिनाथन आपले एक स्त्री तसेच व्यक्ती म्हणून असलेले हक्क यांचे हे उल्लंघन आहे, असे म्हणणे जगा समोर स्पष्टपणे मांडते आणि या आपल्या आत्मसन्मानाच्या मुद्यासाठी इराण यजमान राष्ट्र असलेल्या आशियाई स्पर्धेत खेळण्याची संधी त्यागते. केनिया, उगांडा, अफगाणिस्तान या आणि इतर अनेक देशांमध्ये स्त्रिया आजही मतदाना सारखा अधिकार असूनही केवळ समाजातील रूढी–परंपरा अथवा लोकांना भिऊन त्यांचा समर्थपणे प्रयोग करताना दिसत नाहीत. बर्याच देशांमध्ये तेथील पुरुष नव्हे तर सरकार किंवा प्रस्थापित सत्ता ही स्त्रियांच्या अधिकारांची गळचेपी करताना दिसते. पुढे जाऊन व्यापक विचार केल्यास आपल्या लक्षात येईल की हे द्वंद्व नाही. ते स्त्री पुरुषांमधील द्वंद्व तर मुळीच नाही. सदैव दोन परस्पर विरुद्ध वक्तींमधील हा संघर्ष आहे. याबाबत विंदांनी (विंदा करंदीकर) एक छान रूपक दिलेलं आहे. एकदा ट्रेन मध्ये चढण्याआधी तुम्ही 'बाहेरचे' असता. भरगच्च ट्रेनमध्ये चढताना तुम्ही त्या गर्दीशी सामना करता, झटून आत घुसता, आणि त्यानंतर तुम्ही 'आतले' होता. पुढील स्टेशनवर चढणार्या गर्दीसाठी आता तुम्ही 'आतले' झालेले असता आणि तुमच्यासाठी ही नवी गर्दी 'बाहेरची'! अर्थात आतले आणि बाहेरचे असा होता तर हा मुद्दा. याच रूपकानुसार आज ज्या ज्या व्यक्तीला जगण्याचे मूलभूत अधिकार नाकारले गेले आहेत, त्या त्या प्रत्येकाचा (लिंग भेद रहित) समानतेसाठीचा लढा आहे. हा समतोल साधण्यासाठीचा प्रवास माणूस म्हणून जगणार्या प्रत्येकाचा आहे. स्त्रीवाद किंवा Feminism हा



शब्द आज अनेकदा चुकीच्या अर्थाने घेतला जातो. केवळ स्त्रियांच्या हक्कांसाठी वापरावयाचे हे शस्त्र नाही, तर 'स्त्री पुरुष समानता' हाच स्त्रीवादाचा अपेक्षित हेतू आहे. यंदाच्या महिला दिनाचे उदघोषवाक्य होतेः #Balanceforbetter. समतोल सर्व अंगांनी हवा, परंतु चांगल्या हेतूने, सत् अशा व्यक्तीने. अरेरावीने, दुसर्याला हीन लेखून हा समतोल साध्य होणार नाही. तसा तो साध्य करावयाचाही नाही. या समतोल साधण्यामध्ये स्त्री, पुरुष आणि इतर असा सहभाग अपेक्षित आहे. हा समतोल साधण्यासाठी संपवायचा आहे तो Gender gap, अर्थात लैंगिक विषमता कमी करण्याची गरज आहे. सर्वांना समान संधी प्राप्त व्हाव्यात असे वातावरण निर्माण करणे हे समाज म्हणून आपलेच कर्तव्य आहे. तेव्हाच Opportunities Gap म्हणजेच संधी लैंगिकतेनुसार उपलब्ध असण्यातला भेद नाहीसा होईल. नोकर्यांच्या जाहिरातींमध्ये आजही पाहिले तर बहुतांश जागी 'पुरुष अर्जदाराला प्राधान्य दिले जाईल' अशी तळटीप लिहलेली असते. बरेचदा कामाचे अतिरिक्त तास ही पदाची गरज आहे यामुळे स्त्री अर्जदारांना आधीच डावलले जाते. तसेच काही संस्था स्त्री उमेदवारांना नोकरी देण्याआधीच त्यांचे लग्न किंवा गरोदर असण्यासंबंधी चौकशी करतात. या उलट माझ्या परिचयातील अनेक स्त्रिया कामाच्या ठिकाणी अतिरिक्त वेळ, वैयक्तिक अडचणींचा पाढा न वाचता पुरुष कर्मचार्यासमवेत काम करत आहेत. एक दशकभर केलेल्या जगद्व्यापी सर्वेक्षणाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निरीक्षणानुसार आज जगात निव्वळ सहा (जगात एकूण 195 देश आहेत) देश आहेत जे स्त्री आणि पुरुषांबाबतीत 'समान काम, समान वेतन' तत्त्वाचा पुरस्कार करतात. आणि या सहांत अमेरिका तसेच भारत यांचे नाव नाही, ही बाब विचार करायला लावणारी आहे. स्त्री–पुरुष बरोबरीने सामने खेळू शकतात अशा बुद्धीबळासारख्या खेळात स्त्रियांनी पुढे येण्याचे प्रमाण आजही कमी आहे. उच्चप्रतीचे तंत्रज्ञान उपलब्ध असताना ते अनेक सामान्य पातळीवरच्या स्त्रियांसाठी आजही खुले नाही. कारण आर्थिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक अडचणींचा त्यांना सामना करावा लागतो जो बर्याचदा छुपा असतो. खरं तर देशातील आणि विदेशातील नामवंत माहिती आणि तंत्रज्ञानाच्या कंपन्यांमध्ये स्त्रिया वरिष्ठ पदे उत्तमरीत्या सांभाळीत आहेत. एखादी उच्चशिक्षित स्त्री तंत्रज्ञान हाताळताना पाहणे हे जितके त्या समाजाच्या प्रगतीचे लक्षण आहे तितकेच हेही की एक सामान्य कामगार स्त्री लॅपटाप कुशलतेने वापरताना दिसणे किंवा एखादी आजी ई–पेपर वाचताना दिसणे. आणि याचा अर्थ हातातील मोबाईलवर खेळ खेळणे एवढेच स्त्रियांना यावे असा अजिबात नाही. घराघरातील स्त्री स्वतःचे आर्थिक व्यवहार जितक्या सहजतेने offline हाताळते तितकेच तिने online व्यवहारही कुशलतेने व सक्षमतेने हाताळणे हे यात अपेक्षित आहे.खरं तर शेतकरी किंवा कामगार स्त्रियांपर्यंत तंत्रज्ञान पोहचल्यास देशाच्या प्रगतीत एक मोलाचा वाटा उचलला जाईल कारण एक सज्ञान, साक्षर, स्वयंपूर्ण स्त्री त्या संपूर्ण घरादाराला सज्ञान करते. ही तर विज्ञानाची 'उपयोगकर्त्या'ची बाजू झाली. विज्ञानाची 'संशोधन' बाजू ही देखील महत्वाची आहे. शासन यात स्त्रियांचा सहभाग वाढण्यासाठी प्रयत्नशील आहेच. शास्त्रज्ञ म्हणून पुढे येण्यात स्त्रियांना आर्थिक अडसर येऊ नये म्हणून ISRO, DRDO सारख्या भारतीय शासकीय तंत्र आणि विज्ञान संस्थांमध्ये कुठल्याही पदासाठी स्त्री अर्जदारांसाठी अर्जशुल्क शून्य इतके असते, तसेच अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्रियांसाठी खास अशा शिष्यवृत्त्यांची तरतूद करण्यात आलेली आहे. मागे गुगलचा (माजी) संगणक अभियंता कर्मचारी जेम्स दामोर, याने 2017 साली आपल्या लेखाद्वारे तंत्रक्षेत्रात स्त्रियांचा टक्का कमी का याबाबत आपले मत व्यक्त केले होते. त्याच्या मते स्त्रिया भावनेच्या अधीन असतात, लोकाभिमुख असतात. याउलट पुरुष हे logic ने जास्त विचार करतात, त्यांना वस्तूंमध्ये अधिक रस असतो त्यामुळे त्यांचा मेंदू हा 'system प्रणाली' नुसार काम करतो तर स्त्रियांचा मेंदू हा भावनिक मुद्दा नेहमी विचारात घेत असतो. अर्थात या लेखामुळे अनेक वाद निर्माण झाले. (त्यास नोकरीतून कमी करण्यात आले.) परंतु विज्ञान हे gender biased नाही असंच अनेक विचारवंतांचं म्हणणं आहे. आणि ह्यात तथ्यही आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन हा काही लिंगभेद पाहत नसतो, निसर्गाने कितीही मेंदूच्या रचनेत भिन्नता ठेवली असली तरी! प्रत्येक स्त्रीकडे स्वतःची चौकस, कुतूहलपूर्ण वृत्ती असते आणि ती जितकी विज्ञानाभिमुख असेल तितके श्रेयस्कर. तसेच ज्या स्त्रीला काळाची अनेक वर्षं (दोन–एक शतकं!!) शिक्षणासारखा मुलभूत अधिकारच डावलला गेला होता, तिने हा अधिकार मिळाल्यावर अचानक हजारो वर्षांच्या रूढी, परंपरा, समाजप्रथा यांना झुगारून एका अत्यंत प्रगत क्षेत्रात सहभागी होऊन, हजारोंच्या संख्येने पुढे यावं, अशी अपेक्षा असणंच आततायी आहे. आज भारतात जरी 14 टक्के भारतीय स्त्रियाच संशोधनात आहेत असा अहवाल असला तरी आगामी काळात स्त्री–शास्त्रज्ञांची संख्या उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. IWSA (Indian Women Scientists' Association) ही भारतीय संस्था स्त्री शास्त्रज्ञांसाठी 1973 साली स्थापण्यात आली. तिचे कार्य आजही गाजावाजा न करता अव्याहतपणे सुरु आहे. याचबरोबर दुर्लक्ष न करता येण्यासारखा मुद्दा म्हणजेकामाच्या ठिकाणी स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार व शोषण. याविरुद्ध जगभरात सर्वच देशांत कायदे पास करण्यात आले आहेत. याबद्दल प्रत्येक देशाच्या कायद्यात वेगवेगळ्या अटी व नियम तसेच दंड देखील भिन्न आहेत. भारतात ह्यासबंधी 'कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ विधेयक (प्रतिबंधात्मक व निवारण) 2012, या विधेयकाचा कायदा 2013 साली पारित करण्यात आला.

खरं तर balance for better म्हणजेच समानता. म्हणजे तुमच्या कामापुढे तुमची लैंगिकता विचारात घेतली जाऊ नये. स्त्री–कलाकार, स्त्री–डॉक्टर, स्त्री–अंतराळवीर अशाप्रकारे

*कु. प्रज्ञा बेलेकर.... पृष्ठ 3,*

व्यावसायिक नामाभिधानांच्या आधी 'स्त्री' जोडणं गरजेचं वाटू नये. पुढे केवळ भारतातच नव्हे तर जगात हे दृष्य असेल की शास्त्र, तंत्र, विज्ञान,कला, खेळ यांचा विषय निघाला तर प्रथम तो लिंगनिरपेक्ष असेल. लैंगिक विषमता कमी करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे.भारतात 2013 च्या नवीन कंपनी ऍक्टनुसार सर्व सूचीबद्ध (listed) कंपन्यांच्या संचालक मंडळावर किमान एक स्त्री असणे बंधनकारक केले आहे. या कायद्यातील लैंगिक विभिन्नतेच्या अटीमागे उद्दिष्ट असे होते की Corporate Governance मध्ये स्त्रियांचा वेगळा दृष्टीकोन मिळावा तसेच स्त्री–पुरुष विषमता कमी व्हावी. तसेच देशाच्या GDP मध्ये मोठा हातभार लागु शकेल. SEBI ने मुदतवाढ, दंड असे अनेक प्रयोग करूनही काही listed संस्थांच्या संचालक मंडळावरील स्त्रियांचे प्रमाण केवळ 5 टक्के इतकेच होते. परंतु काही कालावधीनंतर हे चित्र सकारात्मक दिसू लागले. भारतात पुण्यात 1974 पासून असलेल्या ''भगिनी निवेदिता सहकारी बँक'' या बँकेच्या संचालक मंडळात सर्व सभासद स्त्रिया असून ह्या बँकेचा कारभार अतिशय जोमाने सुरु आहे. ही झाली काही प्रातिनिधिक उदाहरणे, जिथे स्त्रियांच्या सकारात्मक प्रगतीमुळे देशाचे पर्यायाने विश्वाचे हित साधले जाते आहे. याचबरोबर विचारांतूनही लैंगिक विषमतेबद्दल प्रबोधन होणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जगभर अनेक साहित्यिक आणि विचारवंत आपापल्या प्रादेशिक भाषांमधून स्त्रीवादी विचार मांडत आहेत. या विचारांनी प्रेरित होऊन येणारी भावी पिढी खचितच लैंगिक समानतेचा पुरस्कार करणारी असेल. जगाच्या पाठीवर अशा अनेक स्त्रिया स्त्री–पुरुष असा भेदभाव न करता समाजोपयोगी कार्यांसाठी आपले आयुष्य पणाला लावीत आहेत. आपणही स्त्री अथवा पुरुष अथवा इतर असे लिंगभेदप्रामाण्य न होता, सर्वांसाठी समानतेचा पुरस्कार करणारी 'व्यक्ती' होऊया. प्रगतिशील राष्ट्र ते प्रगत राष्ट्र असा सेतू बांधताना प्रत्येकजण खारीचा वाटा उचलुया.

**संदर्भ:**


*1. विकिपीडिया*

*2. वित्तार्थ by डॉ रुपा रेगे–नित्सुरे*

*3. जेम्स दामोर (माजी संगणक अभियंता, Google) यांचा लेख*


--------

## 8 मार्च महिला दिन विशेष

प्रत्येक स्त्री ही सक्षमच असते. ही स्त्री शक्ती ओळखून तिच्यातील सूक्ष्म गुणांना वाव मिळण्यासाठी स्त्री सुशिक्षित असणे गरजेचं असतं. याच स्त्रीशिक्षणाची जननी म्हणजे 'सावित्रीबाई फुले'.

जागतिक स्थरावर विशेष महत्व असलेला दिवस म्हणजे 8 मार्च 'जागतिक महिला दिवस' समस्त स्त्री जातीचा सन्मान करण्याचा दिवस. असे असताना ही निर्भया सारख्या अनेक घटना कां घडतात? खेदाची गोष्ट ही की फक्त 8 मार्च या दिवशीच स्त्री सन्माननीय का असावी? आजच्या प्रगत युगात सर्वच स्त्रियांना योग्य सन्मान मिळतो का? याचे उत्तर दाहक असले तरी 'नाही' असेच आहे. लिंगाधारीत समाजाच्या विरोधात बंड करुन स्त्रियांना अनेक संघर्षांना सामोरे जात आजची स्त्री वेगवेगळ्या कार्यक्षेत्रा मध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठवत आहेत.

नाण्याची एक बाजू स्त्रीचा सर्वांगीण विकास दाखविते. तर दुसरी बाजू बहुतांश स्त्रिया सामाजिक, कौटुंबिक, शारिरीक अत्याचाराला बळी पडताना दर्शविते. स्त्री म्हणजे प्रकृतीचे दुसरे नाव. वसुंधरेला लाभलेली सर्जनशीलता स्त्रीकडे निसर्गदत्तच आली. निसर्गाने सृजनशीलतेचा बहुमान देऊन तिला सन्मानित केले. या निसर्गदत्त अश्या बहुमोल देणगीच्या बळावरच प्रत्येकीने स्वतःतील 'मी' चा शोध घेतला पाहिजे. बदलत्या काळानुसार बदलले पाहिजे. थोडासा त्रास होईल पण त्यातुनच स्वतःचे तेज ओळखुन त्या तेजबिंदुतून अनेक तेजोवलय निर्माण केले पाहिजे.

एकेकाळी उंबरठ्याआड जगणं बंदिस्त झालेली स्त्री आज पायातल्या बेड्या झुगारुन देऊन नवनवीन क्षेत्र पादाक्रांत करते आहे. समानतेचा हक्क मागता–मागता अनेक पातळयांवर तिने पुरुषांच्याही पुढे झेप घेतली आहे. स्त्री शक्तीचा नारा सर्वत्र घुमतो आहे. पण या जयजयकाराच्या निनादात ती आश्वस्त झाली आहे का? की आजही ती अंर्तयामी अस्वस्थ आहे?

भारतीय स्त्रियांसमोर नेहमी सीता–सावित्रीचे आदर्श ठेवले जातात. तिच्या नकळत दुय्यमत्वाचे संस्कार तिच्या मनावर बिंबवले जातात. पुराण कथातील द्रौपदी ही कधीच आदर्श म्हणून मुलांसमोर ठेवली जात नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे. ती तेजस्विनी होती. मानिनी होती. भर राजसभेत द्युतात हरवलेल्या युधिष्ठीराला आपल्या पत्नीला पणाला लावण्याचा काय अधिकार आहे! असा प्रश्न विचारुन ती ज्येष्ठ मंडळी निरुत्तर करु शकत होती.

तथाकथित संस्कृतीचा पगडा समाजावर आहे तो घातक आहे. याचे भान उशीरा का होईना पण येऊ लागला. स्त्रीशिक्षण विकास, आर्थिक दर्जा, आरोग्य, राजकीय, समाज व्यवस्थे मध्ये स्त्रीचे पुर्नवसन हे सर्व मुद्दे ऐरणीवर आले. भारता मध्ये ब्रिटीश राजवटीत शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. जागतिक, सामाजिक, समाजव्यवस्था यातील स्त्रीचे स्थान, स्त्रीशिक्षण किती महत्वाचे आहे, याची जाण भारतींयाना आली. भारतातील समाज सुधारणेचा अभ्यास केला तर एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते म्हणजे जेव्हां स्त्रीच्या पाठीशी तिचे कुटुंब उभे राहते तेव्हां तिचा सर्वांगीण विकास होऊन ती सक्षम बनते. सामाजिक दर्जा मिळतो. यासाठी समाजाने आपली विचारणसरणी बदलली पाहिजे. अत्याचाराला बळी पडलेल्यांना आधार देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. स्त्रियांनी ही आपल्या मुलांना वाढविताना समानतेची जाणीव ठेवून वाढवले पाहिजे. प्रत्येक मुलीला संस्कृतीच्या पगड्याखाली न ठेवता आत्मनिर्भयता, आत्मसन्मान, आत्मविश्वास तिच्यात निर्माण केला पाहिजे. तरच ती एक 'सक्षम स्त्री' म्हणून जगू शकेल आणि हीच नारी स्वतः स्वतःचा आत्मविश्वास, आत्मनिर्भयता, आत्मसन्मान हा स्त्रीतत्वाचा साज लेऊन खंबीरपणाने उभी राहील तेव्हा तिला समाजाकडून किंवा कुठल्याही संस्थेकडून सन्मानाची आवश्यकता भासणार नाही. तिच्या कर्तृत्वाच्या बळावर ती स्वतःभोवतीच 'तेजोवलय' त्यातील 'तेजोनाद' यांनेच ती झळाळून जाईल.



# A SAFE WORKPLACE IS EVERY WOMAN'S FUNDAMENTAL RIGHT

SMT. JAYA P. DHIRWANI
SR. ADMINISTRATIVE OFFICER

## Implementation of the Prevention of Sexual Harassment at Workplace Act (POSH Act), 2013 In Mumbai Port

It is the responsibility of every employer to ensure safety and dignity of women in a work environment to improve their active participation in decision making at work places.

As an outcome of the landmark Judgement of **Vishakha and others Vs. State of Rajasthan**, the POSH Act, 2013 was enacted to provide a mechanism to redress work place grievances pertaining to sexual harassment of women and also to ***enforce right to gender equality of women***. This Act is nearing its 6th anniversary and reflects the commitment of the Government of India to the ratification of the Convention on Elimination of all forms Discrimination Against Women (**CEDAW**).

Though sexual harassment at workplace has assumed enormous proportions, women do not report the matter to the concerned authorities in most cases **due to fear of reprisal, being stigmatized or losing professional standing and personal reputation.**

Three main obligations have been placed on the institutions by the POSH ACT namely Prohibition, Prevention and Redressal. It is important to note that this Act provides for a civil remedy to women and is in addition to other laws that are currently in force. Consequently, any woman who wishes to report instances of sexual harassment at workplace has the right to take recourse **to both civil and criminal proceedings.**

The POSH Act defines who is the **aggrieved women [Section 2(a)]** and the definition of **workplace** as per the Act is "any place visited by the employees arising out of or during the course of employment including the transportation provided by the employer for undertaking such journey". **{Section 2(o) [v]}**

**IMPLEMENTATION OF THE POSH ACT IN MUMBAI PORT**

In so far as the prohibition mandate of the POSH Act is concerned, MbPT has made a provision in the MbPT Employees' conduct Regulations, 1976 **{Regulation 3A}** which reads as under :

(1) No employee shall indulge in sexual harassment of any woman at their workplace,

(2) Every employee in charge of a workplace shall take appropriate Steps to prevent sexual harassment of any woman at such workplace.

Various measures are being taken in Mumbai Port to prevent incidences of sexual harassment at workplace. Workshops are conducted regularly at PMTC to sensitize male employees about the repercussions of sexual harassment. Female employees are trained about the ways and means available to them for redressal of the grievances related to sexual harassment. In house faculty conduct these sessions regularly at PMTC.

A grievance redressal mechanism as prescribed by the POSH Act is in place in Mumbai Port. The names of Nodal representatives and members of the Complaints Committee have been widely publicized so that the complainant is able to obtain assistance at appropriate levels.



## The redressal process in Mumbai Port is briefly explained here:

***Incident of sexual harassment at workplace***

***Internal Committee***

***Conciliation***

***Report of the Enquiry***

***Action for misconduct*** | ***No action by Employer*** | ***punishment for false complaint/evidence***

***Appeal to Court/Tribunal***

Although the law has been in force since 2013, proper implementation of the provisions of the statute remains a challenge. It is to be pointed out that very few cases of harassment have been received by the Complaints Committee of our Mumbai Port and since the year 2015 penalty has been issued by the concerned Disciplinary Authorities in only one case. **Total number of cases received by the complaints committee in the years 2016, 2017 and 2018 is 2, 1 and 1 respectively**. Out of these 4 cases in last three years, one was declared as not within the ambit of IC and another one ended in conciliation.

**SUGGESTIONS FOR CHANGING THE SITUATION:**

Lewd jokes and inappropriate comments, etc. are dismissed as normal behavior by male employees. The women being hesitant to initiate actions due to apprehension of being disbelieved or ridiculed, underpins the need for greater awareness and greater enforcement.


Following are the tips to **prepare a self-contained complaint under POSH:**

1) The complaint should be addressed to the IC members and not to the HOD Or HRD
2) The complaint should be concise and written in a simple and easy to Understand language. Lengthy complaints should be avoided
3) Details of exact incident, date and time, witness, etc. to be included
4) Circumstances preceding and following the incident to be recorded
5) Append as many documents as possible i.e. relevant e-mails, screenshots of SMS's/ whatsapp messages, call details, photographs, recordings, etc.
6) Details of the respondent including name, designation, reporting structure between complainant and respondent, if any (whether subordinate, colleague or superior)
7) Relief that is sought from the employer to be clearly written It is the duty of the organization to provide facilities to IC for dealing with complaints and enquiries. Following are some practical tips for **constitution of the Internal Committee:**

1) IC should comprise of women members who have been trained on the POSH Act and POSH Rules and their roles and responsibilities
2) It is preferable to have an **odd number of members** in order for the IC to Arrive at a decision based on majority in case of a divided opinion
3) The IC members should be selected based on evaluation of various factors Including whether they are accessible, approachable committed, sensitive and understanding.
4) They should have good credibility and **technical competency** to handle Grievance procedures
5) As far as possible provide the IC separate space for conducting their Meetings and maintaining records of cases of sexual harassment to avoid Allegations of bias or favoritism
6) Hold periodic discussions between the IC members and conduct Regular trainings. In addition to the above suggestions, it is good for our organization to have an **anti-sexual harassment policy** taking into consideration the following:

a) Clearly define 'sexual harassment' and outline the scope and applicability
b) Mention how the organization ***practices zero-tolerance*** towards sexual Harassment at workplace
c) **Extended concept of the workplace** to be considered
d) Complaint mechanism
e) Regularly distribute and promote this policy across all levels of organization
f) Provide **a copy of the policy to new joiners** as part of their induction
g) Review the policy periodically and update information regarding the IC Members on a timely basis.

# कविता





सौ. कल्पना कुलकर्णी
आशुलिपिक विशेष श्रेणी
सामान्य प्रशासन विभाग

## स्त्री शक्ती

नवरात्राचे नऊ दिवस करतो अंबाबाईचा जागर,
खरंच सांगा समाजामध्ये होतो का हो स्त्री शक्तीचा आदर ?
अजुनही मानतो मुलींपेक्षा जन्मा येवो घरोघरी कान्हा
स्त्रीचा जन्म म्हणजे खरंच आहे का गुन्हा ?
स्त्री-पुरुष-भेदा-भेदाचा अजुन ही जनमानसी झगडा,
अन् स्त्री जन्माची भीती हा संस्कारांचा पगडा
स्त्री म्हणजे माता-भगिनी, स्त्री एक शक्ती,
तरीही अत्याचार ही तर राक्षसी प्रवृत्ती
अत्याचारावेळी यांची लयास जाते नीती
स्त्री म्हणजे जिजाई, स्त्री राणी लक्ष्मीबाई
आज स्त्री आहे पायलट ही, आकांशा आभाळास नेई
प्रश्न पडतो मनाला.....
" महिला दिन " एक दिवस बाकी सर्व वर्ष केव्हां सुखद जाईल?
उत्तर ही दिले मनानेच
जेव्हां स्त्री ही जननी-पुरुषांची जन्मदात्री याची जाणीव सर्वांना होईल.







सौ. सुमेधा प्रविण मराठे
अवर सहायक
कल्याण प्रभाग

स्त्री ला कसला आलाय थकवा....?
स्त्री म्हणजे शक्तीचा....उर्जेचा..... अक्षय ठेवा

सकाळपासून अखंड कामाचा चरक
तब्बेत बरी असो नको.... कधी न पडे फरक
करी सर्वांचे हसतमुखे....जणू फुलांचा ताटवा...
स्त्री म्हणजे शक्तीचा....उर्जेचा..... अक्षय ठेवा

अर्थार्जन...सर्वांची दुखणी खुपणी...आल्या गेल्याचे स्वागत
माहीतच नाही कधी घरी येणे रमत गमत
पुरवता सर्वांच्या अपेक्षा.....कधी नाही विसावा
स्त्री म्हणजे शक्तीचा....उर्जेचा..... अक्षय ठेवा

स्त्री देखील शिणते... दमते....विसावू इच्छिते
जास्त काही नाहीं... थोडा..'Me time' मागते...
तेव्हडेच मिळावे... नको नुसता महिला दिनाचा देखावा...

नाहीतर आहेच कौतुकाच्या आवरणा खाली

स्त्री ला कसला आलाय थकवा....?
स्त्री म्हणजे शक्तीचा....उर्जेचा..... अक्षय ठेवा



# कविता



श्रीमती प्रीती इप्ते
आशुलिपिक
गोदी विभाग.

## आर्जव

चिमुकल्या पावलांनी, आनंद घेऊन येईन
या जगात येऊ देण्या मला, बाबा साथ दे,
बोबिड्या बोलांनी, किलबिल मी करीन,
अडखळता अडखळता शिकविण्या, बाबा साथ दे

खेळता खेळताना, हळूच मी रुसेन
गालावर हासू फुलविण्या माझ्या, बाबा साथ दे,
हात धरुन तुझा, पुढे-पुढे मी जाईन
पडता-पडता सावरण्या मला, बाबा साथ दे.

नसेन जरी, तुझ्या वंशाचा दिवा
तेवत ठेवण्या मलाही तू, बाबा साथ दे,
मुलगा अन् मुलगी असा, करु नकोस ना भेद
तोच हक्क मिळण्या मला, बाबा साथ दे.

जगण्याची, पल्लवित माझी आशा
दो हातांनी जपण्या, बाबा साथ दे
मी ही होईन, भक्कम आधार तुझा
विश्वास हा खरा ठरण्या, बाबा साथ दे

गर्भातच नको संपवू, माझ्या येण्याचा हट्ट,
नाळ तुझी-माझी जुळण्या, बाबा साथ दे
दैवानेच दिला तुला, भी जन्माचा बंध
सत्य हेच स्विकाराया तू, बाबा साथ दे
सत्य हेच स्विकाराया तू, बाबा साथ दे



## प्रिय सखीस...



श्रीमती मधुरा चव्हाण
ई.डि.पी. प्रभाग



तू जरा मोकळी हो बाई ॥
संसाराच्या व्यापातून असे नाही म्हणत मी
तू जरा मनाने मोकळी हो ॥
तुझ्या मुला बाळात तू तुझे जे मन
अडकवून घेतलस गुंतवुन घेतलयंस
ते मोकळे करून घे स्वत:साठी
आत्ताच मोकळी हो.
आता तुझी मुलं लहान आहेत
तुझ्यावर अवलंबून आहेत म्हणून
तू त्यांच्यात गुंतलेली आहेस.
पण तुझ्या मनाने तू एवढी गुंतलेली आहेस
याची तुला कल्पना कधी येईल माहिती आहे?
जेव्हा त्यांना नवीन वाटा खुणावू लागतील
आणि नवीन आव्हानांची क्षितीजे त्यांच्या समोर येतील
आणि ती दूर जातील. परदेशात जातील.
आणि तिथेच कायमची सेटल होतील.
तेव्हा तुला जाणवू लागेल एक भयानक पोकळी.
कारण तेव्हा तुला माहीतच नसेल की या रिकाम्या वेळचे करायचं काय?
त्याचा आत्तापासूनच तू नियोजन करायला शिक तरच तुझा पुढे निभाव लागेल.
अगदी तुझ्या लहानपणापासूनचा विचार करायला लाग.
लहान असताना तुला पूर्वी कसली कसली आवड होती ते आठवायला शिक.
जुने दिवस आठव. जुन्या मैत्रिणींना शोधून काढ. त्यांना भेट.
त्याही तुझ्या सारख्या गुरफटलेल्या असतील. त्यांना त्या गुंत्यातून सोडव.
माहेरच्या जुन्या जिव्हाळ्याच्या नातेवाईकांना जाऊन भेट.
कामामुळे किती तरी वर्ष तु त्यांना फारशी भेटलेली नाहीस.
फक्त फोन करत होतीस एवढंच. त्यांना वैयक्तिकरित्या जाऊन भेट.
तुझी स्वत:ची जिव्हाळ्याची बेटं शोधून काढ. खूप आढळतील छोटी छोटी बेटं.
हि जिव्हाळ्याची बेटं म्हणजे तुझी आवडती माणसं असतील किंवा तुझी आवडती ठिकाणं असतील.
तसा विचार कर आणि त्या बेटावर अधूनमधून जात जा.
गप्पा गोष्टी करा. जुन्या आठवणींना उजाळा द्या.
आजवर संसारासाठी तू खूप खस्ता खाल्ल्या आहेत.
स्वत:च्या आवडी निवडी बाजूला ठेवल्या आहेस.
एवढ्या बाजूला ठेवल्यास कि त्या विसरून गेलीस.
तुला आठवते का लहानपणी तुला कदाचित गाणी म्हणायला आवडत असेल.
तुला कदाचित हार्मोनियम वाजवायला आवडत असेल.
किंवा तुला मनमुराद भटकायची आवड असेल म्हणून म्हणते आठवतेस का जरा.
बघ बाई तुझी काळजी वाटते म्हणून सांगते. जरा मोकळी हो बाई॥

